रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २०६
www.ramprahar.com

मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## प्रणित मोरे मारहाणप्रकरणी मुख्य आरोपीला अटक



**सोलापूर :** स्टँडअप कॉमेडियन प्रणित मोरे याला मारहाण केल्याप्रकरणी मुख्य आरोपी तनवीर शेखला सोलापूर शहर पोलिसांनी अटक केली आहे. २ फेब्रुवारीला प्रणितला सोलापुरात मारहाण झाली होती. कार्यक्रमादरम्यान प्रणितने अभिनेता आणि माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे नातू वीर पहाडिया याच्यावर विनोद केला होता. याचा राग मनात धरून १० ते १२ जण कार्यक्रम संपल्यानंतर सेल्फी काढण्याच्या बहाण्याने जवळ गेले आणि अचानक प्रणित मोरे याला बेदम मारहाण केली. या प्रकरणी १० जणांवर सोलापुरातील सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता तसेच काही जणांना ताब्यात घेण्यात आले, मात्र मुख्य आरोपी फरार होता. अखेर पोलिसांनी मुख्य आरोपी तनवीर शेखच्या मुसक्याही आवळल्या आहेत.

## अंतरंग

मुरूड शासकीय विश्रामगृहाच्या दुरूस्ती कामाला सुरुवात/२

बैलगाडा संघटना व गोरक्षक यांच्यामध्ये बैठकीचे आयोजन/५

रोहित शर्माच्या शतकी खेळीने विक्रमांची रांग/८

# शेतीमध्ये एआयचा वापर करणार

### कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती ; अलिबागमध्ये परिसंवाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुढील काळ शेतीसाठी आव्हानात्मक आहे. तरुणवर्ग शेतीकडे वळावा यासाठी काही उपाययोजना कराव्या लागणार आहेत. कालबाह्य झालेले तंत्रज्ञान आता वापरून चालणार नही. आधुनिक तंत्रज्ञान वापरावे लागेल. त्यामुळे शेतीमध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा (एआय) वापर करण्याचा आमचा मानस असून राज्याच्या आगामी अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करण्याचा प्रयत्न आहे, अशी महिती राज्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली.



कृषीमंत्री ॲड. कोकाटे यांच्या सकल्पनेतून कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातर्फे सोमवारी (दि. १०) अलिबाग येथील नियोजन भवनात कोकणातील प्रगतशील व प्रयोगशील शेतकऱ्यांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादत कोकणातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील शेतकरी सहभागी झाले होते. या वेळी कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मार्गदर्शन करताना कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, आता सेंद्रीय शेतीला महत्त्व आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रासायनिक शेती करण्याऐवजी सेंद्रीय शेतीकडे वळले पाहिजे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. शेतीतील उत्पादन खर्च कमी करावा लागेल. कमी पाण्यावर जास्त उत्पादन मिळावे अशी शेती करावी लागणार आहे.

शेतकरी आणि कृषी विद्यापीठे यांच्यातील अंतर वाढत आहे. विद्यापीठांनी तयार केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहचत नाही. त्याचा प्रचार व प्रसार होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना माहिती वेळेत मिळत नाही. शेतकरी, कृषी विभाग व विद्यापीठ यांच्यात समन्वय साधण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे कृषीमंत्री म्हणाले. **(पान २ वर..)**



# पनवेल महापालिका क्षेत्रातील न्हावाशेवा टप्पा ३ पाणीपुरवठा योजनेची आढावा बैठक

### सर्वांनी समन्वय साधून वेळेत काम पूर्ण करा -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील शहरी आणि ग्रामीण भागांना पाणीपुरवठा करणाऱ्या न्हावाशेवा टप्पा ३ पाणीपुरवठा योजनेचा आढावा आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. १०) घेतला. पाणीपुरवठ्यामध्ये येणाऱ्या तुटीची भरपाई करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी योजनेचे वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सूचित केले.

पनवेल महापालिकेत झालेल्या या बैठकीला प्रांताधिकारी पवन चांडक, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता रमेश वायदंडे, श्री. वेगुर्लेकर, एमएसआरडीसीचे श्री. करंजकर, मनपा उपायुक्त गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पनवेल शहर वरिष्ठ निरीक्षक पोलीस नितीन ठाकरे, खांदेश्वर वरिष्ठ पोलीस निरीक्षक ढाकणे आदी उपस्थित होते.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी सूक्ष्म स्तरावर पाठपुरावा केला असून त्यांच्या प्रयत्नांबाबत या वेळी समाधान व्यक्त करण्यात आले. योजनेच्या कामात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी कंत्राटदार आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पूर्ण सहकार्य करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.

या योजनेचे काम एप्रिल २०२५पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांचा समन्वय सुनिश्चित करण्यात आला. योजनेच्या वेळेत अंमलबजावणीसाठी उपस्थित अधिकारी आणि कंत्राटदारांनी पूर्ण बांधिलकी दर्शवली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली राज ठाकरे यांची भेट



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १०) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. दरम्यान, या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांनी ही भेट राजकीय नव्हती, असे स्पष्ट केले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी मुख्यमंत्री झाल्यानंतर राज ठाकरे यांचा अभिनंदनाचा फोन आला, तेव्हा मी त्यांना सांगितले होते की मी घरी येईन, त्याप्रमाणे मी त्यांच्या घरी गेलो होतो. ब्रेकफास्ट केला, गप्पा मारल्या. या बैठकीचा कुठलाही राजकीय संदर्भ नाही. केवळ मैत्रीच्या भावनेने मी त्यांच्या घरी गेलो होते.

## आजपासून बारावीची परीक्षा



**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात इयत्ता बारावीची लेखी परीक्षा मंगळवार (दि. ११)पासून सुरू होत आहे. यासाठी मंडळाने तसेच प्रशासन व पोलिसांकडून तयारी करण्यात आली आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात येणारी बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. या परीक्षेसाठी एकूण १५,०५,०३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामध्ये ८,१०,३४८ मुले, ६,९४,६५२ मुली आणि ३७ ट्रान्सजेंडर आहेत.

एकूण १०,५५० कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३,३७३ मुख्य केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली.

## निवडक

### युट्यूबर रणवीर अलाहबादियाच्या वादग्रस्त टिप्पणीप्रकरणी चौकशी

**मुंबई :** प्रसिद्ध यूट्यूबर रणवीर अलाहबादिया याने स्टँड-अप कॉमेडियन समय रैनाच्या इंडियाज गॉट लेटेंट कार्यक्रमात स्पर्धकांशी बोलताना पालकांविषयी वादग्रस्त टिप्पणी केली. या प्रकरणी आलेल्या तक्रारीनंतर मुंबई पोलिसांनी चौकशीला सुरुवात केली आहे. दरम्यान, चुकीचे वक्तव्य करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

### माजी मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा सुखरूप परतला

**पुणे :** माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषीराज सावंत सोमवारी (दि. १०) दुपारी पुणे विमानतळावरून बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली होती. पुणे पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्र फिरवली. यानंतर अखेर ऋषीराज हा पुणे विमानतळावर सुखरूप दाखल झाला असल्याची माहिती पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली.

# योग्य नियोजनासह सकारात्मकतेने परीक्षांना सामोरे जा -पंतप्रधान मोदी

### ■ 'परीक्षा पे चर्चा'मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

**मुंबई : प्रतिनिधी**

जीवनात स्वतःशी स्पर्धा ठेवून प्रत्येक क्षण सकारात्मकतेने जगा. आत्मविश्वास वाढण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करा, उद्दिष्टांचे लहान लहान टप्पे करून ते पूर्ण केल्याचा क्षण साजरा करा तसेच परीक्षांचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. त्यातून नक्की यश मिळेल, असा, सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना सोमवारी (दि. १०) दिला.



दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी नवी दिल्ली येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या मुंबईत शिवाजी पार्क येथील स्काऊट आणि गाईडच्या सभागृहात झालेल्या प्रसारण कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासह विविध शाळांमधील विद्यार्थी उपस्थित होते.

अपयश हे जीवनात यशस्वी होण्यासाठीचे इंधन असते, असे सांगून पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांना अपयशाची भीती न बाळगता त्याला आपला गुरू बनविण्याचा सल्ला दिला.

आव्हाने ही सर्वांसमोर असतात. सकारात्मकतेने त्यावर मात करावी. विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातील भीतीवर विजय मिळवावा. सरावाने सामान्य माणूसदेखील असामान्य काम करून असामान्य बनू शकतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

# स्व. शिवकुमार शर्मा यांच्या आरोपींना अटक करा

### विहिंप, बजरंग दलाची मागणी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

दोन युवकांकडून हेल्मेटने झालेल्या मारहाणीत मृत्युमुखी पडलेले शिवकुमार शर्मा यांना विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या नेतृत्वात सकल हिंदू समाजाद्वारे रविवारी (दि. ९) खारघर पोलीस ठाण्यासमोर श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या श्रद्धांजली सभेला आमदार प्रशांत ठाकूर हेही उपस्थित होते. स्व. शर्मा यांच्या आरोपींना लवकरात लवकर अटक व्हावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

वाशी येथील रहिवासी शिवकुमार शर्मा यांना २ फेब्रुवारी रोजी खारघरमधील उत्सव चौक येथे दोन युवकांकडून हेल्मेटच्या सहाय्याने जबर मारहाण करण्यात आली होती. डोक्यात हेल्मेटने वारंवार प्रहार केल्याने शर्मा यांचा मृत्यू झाला. दोन्ही आरोपी खारघर येथे आयोजित इज्तेमा कार्यक्रमावरून आले असल्याचे सांगितले जात आहे. या धक्कादायक व संतापजनक घटनेच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या नेतृत्वात सकल हिंदू समाज रविवारी खारघर पोलीस ठाण्यासमोर एकवटला होता. या वेळी स्व. शर्मा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या श्रद्धांजली सभेला विश्व हिंदू परिषदेचे प्रमोद प्रसन्ना, स्वरूप पाटील, कृष्णा बांदेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमोद पांडे, हिंदू जागरण मंचचे दत्तात्रेय शिंदे, शिवम सिंग, ललित चौधरी, जागृत फाउंडेशनचे ज्ञानेश्वर खरपुरिया, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, उपाध्याय किरण पाटील, माजी नगरसेवक संतोष शर्मा, संध्या शारबिंद्रे, बिना गोगरी, साधना पवार, शैलेंद्र त्रिपाठी, झूमा चक्रवर्ती, गायत्री खडवडकर, शर्मा कुटुंबियांसह विविध संघटनांचे पदाधिकारी, स्वयंसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. शिवकुमार शर्मा यांच्या आरोपींना अटक करून खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा, दोषींना फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी तसेच या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करावी आदी मागण्या या वेळी पोलिसांकडे करण्यात आल्या.

## राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या!



**नागपूर : प्रतिनिधी**

रात्री आणि पहाटे थंडी, तर दिवसा मात्र उन्हाच्या तीव्र झळा... गेल्या आठ दिवसांपासून राज्यातील वातावरण असेच काहीसे झाले आहे, पण आता उन्हाच्या झळा आणखी तीव्र होणार आहेत.

राज्यात किमान आणि कमाल तापमान वाढले आहे. हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार सध्या वायव्य राजस्थान व परिसरात चक्रकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. दरम्यान, राज्यात कोरडे व शुष्क वारे वाहत असून उन्हाच्या तीव्र झळा नागरिकांना बसत आहेत.

राज्यातील तापमानात सातत्याने चढ-उतार होत आहे. थंडी अजूनही पूर्णपणे ओसरलेली नाही, पण बऱ्याच ठिकाणी उन्हाचा चटका वाढू लागला आहे. राज्यात कमाल तापमानात एक ते दोन अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता असून येत्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तापमानवाढीची शक्यता आहे. त्यानंतर तापमानात हळूहळू घट होईल. विदर्भात कमाल तापमानात मोठा बदल अपेक्षित नाही. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ तासात तापमान स्थिर राहणार आहे, मात्र त्यानंतर तीन ते चार दिवसांत दोन ते तीन अंश सेल्सियसने घट होण्याची शक्यता आहे.

विदर्भात मात्र उलट परिस्थिती राहील, जिथे पुढील तीन दिवस किमान तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानंतर मोठा बदल होणार नाही, असे हवामान विभागाने म्हटलेय.

# नमो चषक : रुस्तम-ए-हिंद पैलवान लाली गुरुदास पोल कुस्ती किताब विजेता

### पाच लाख रुपये व मानाची गदा देऊन सन्मान

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली येथे नमो चषक भव्य क्रीडा महोत्सव अंतर्गत कुस्ती स्पर्धा रंगली. या स्पर्धेत रुस्तम-ए-हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) या पैलवानाने इराणचा आंतरराष्ट्रीय पैलवान जलाल इराणला चारीमुंड्या चीत करून किताब पटकावला.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

लाली गुरुदास पोलला पाच लाख रुपये व मानाची गदा देऊन लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या स्पर्धेला प्रमुख मान्यवर म्हणून युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नमो चषकचे मुख्य आयोजक व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभली.

या सामन्यांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, स्थायी समितीचे माजी सभापती व स्पर्धा संयोजक अमर पाटील, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, कळंबोली गुरूद्वारा अध्यक्ष नारिंदर सिंग भुल्लर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमर ठाकूर, मनीषा निकम, पैलवान बबन पवार, रूपेश पावशे, योगेश लहाने, गौरव नाईक, देविदास खेडकर, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक यांच्यासह कुस्तीप्रेमी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### महाराष्ट्र चॅम्पियन अमेघा घरतची लक्षणीय कामगिरी

महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अमेघा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना झाला. यामध्ये अमेघाने बाजी मारत ५१ हजार रुपये व मानाची गदा पटकावली. या स्पर्धेत महिलांच्या गटातील तीनही सामन्यात अमेघाने विशेष चमकदार कामगिरी केली. त्यामुळे ती या स्पर्धेतील लक्षणीय पैलवान ठरली.


# आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शांत मनाने परीक्षा द्या -मंत्री दादाजी भुसे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा उद्या दिनांक ११ फेब्रुवारी पासून सुरू होत आहेत. यानिमित्त शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मंत्री दादाजी भुसे म्हणतात, प्रिय विद्यार्थी बंधू आणि भगिनींनो, आपल्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता बारावीची परीक्षा. ११ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी राज्यभरातील १५,०५,०३७ विद्यार्थी ३,३७३ केंद्रांवर परीक्षेला सामोरे जाणार आहेत.

आपले कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या कसोटीचा हा क्षण आहे. आत्मविश्वास



आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शांत मनाने, नीट तयारी करून आत्मविश्वासाने परीक्षा द्या. परीक्षा म्हणजे केवळ गुण मिळवण्याची स्पर्धा नाही, तर आपली ज्ञानपातळी तपासण्याची संधी आहे.

शासन, प्रशासन, पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाज तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे कोणताही तणाव न घेता, सर्वतोपरी प्रयत्न करून उत्तम कामगिरी करा. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत परीक्षेच्या दिवशी सकाळी ९ वाजलेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी लागू केले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये जिल्हादंडाधिकारी यांनी जिल्ह्यातील नमूद परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात परीक्षेच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी तसेच सदरील परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी परीक्षेच्या दिवशी ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ रोजी पर्यंत सकाळी ९ वाजलेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारित केले आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा होईल असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटर परिसरातील एस.टी.डी. बुथ, झेरॉक्स सेंटर, टायपिंग सेंटर, ध्वनीक्षेपण इ. माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्यूलर फोन, फॅक्स, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यास मनाई असेल. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस वाहनास प्रवेशास मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी,कर्मचारी तसेच परीक्षा केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी पोलीस अधिकारी यांच्याबाबत राहणार नाहीत.

# मुरूड समुद्र किनाऱ्यावरील शासकीय विश्रामगृहाच्या कामाला सुरुवात

## दुरुस्तीसाठी ६० लाखांचा निधी प्राप्त

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुड शहर परिसर निसर्गरम्य असल्याने जगातून पर्यटक मुरुडला भेट देतात .नवाबकालापासून मुरुड शहराची रचना सुंदर आहे .शासकीय कार्यालये तसचे विश्रामगृह समुद्रकिनारी आहेत. सार्वजनिक बांधकाम ,वनविभाग व जिल्हापरिषदेचे अशी तीन विश्रामगृह आहेत . कोव्हीड काळात विश्रामगृह आरोग्य विभागाला वर्ग केल्याने ५ वर्षात त्यांची कोणतीही दुरुस्ती झाली नाही . त्यामुळे त्यांची अतिशय वाईट परिस्थती झाली होती नुकताच शासनाचा निधी प्रात झाल्याने दुरुस्तीच्या कामाला सुरवात झाल्याने समाधान व्यक्त होत आहे .

प्रवेशद्वारावर काटेरी झाडांचे जंगले तयार झाले होती .भिंतींवर झाडे उगवलीत. ४ वर्षपूर्वीच नूतनीकरण करून २ वातानूकुतील कक्ष व ३ साधे कक्ष बनवण्यात आले होते त्यानंतर मुरुडला झालेल्या वादळात वरील पत्रे उडून गेल्याने नवीन केलेल्या कक्षाचे मोठे नुकसान झाले.आरोग्यविभागाने त्यांचे साहित्य नेल्याने विश्राम गृह सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग केले .

सार्वजनिक बांधकाम खात्याने नूतनीकरांसाठी २०२० ला ८० लाखाचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यलयाला पाठवल्याची माहिती अभियंता माने यांनी दिली होती. ५ वर्षानंतर ६० लक्ष निघी आल्याने इमारत दुरुस्तीचे काम सुरु झाले .



**सार्वजनिक बांधकाम खात्याचा ६० लाख निधी आल्याने दुरुस्तीचे काम सुरु आहे .६ महिन्यात काम पूर्ण करण्याची मुदत आहे .आतील कामाचा नवीन प्रस्ताव देणार आहे.**
**-अजित सांगळे अधिकारी , सार्वजनिक बांधकाम खाते**

# खालापूर तालुक्यात १६ कोटींच्या जलसंधारण प्रकल्पांचे भूमिपूजन

**खोपोली : प्रतिनिधी**

शिवसेना प्रमुख नेते व महाराष्ट्राचे, कार्यक्षम उपमुख्यमंत्री . एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य सरकारच्या राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत रायगड जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग कर्जत विभागाच्या माध्यमातून खालापूर तालुक्यात १६ कोटी रुपये खर्चून जलसंधारण प्रकल्पांचे भूमिपूजन संपन्न झाले.

रविवार ( दि.९) रोजी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.खानाव, खरीवली, गोहे, गोरठण, होराळे, परखंदे, वावोशी आणि वडवळ या गावांमध्ये सदर योजनेमुळे सदर तलावांचे पुनर्जीवन होऊन गावांमध्ये पर्यावरण स्थळ विकसित होणार आहे त्यामुळे गावाच्या आणि तालुक्याच्या लौकिककात भर पडणार आहे.

यामुळे स्थानिक नागरिक, शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमास शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी आनंद व्यक्त केला.



# पोषण आहार योजनेच्या अंतर्गत पाककृती स्पर्धेत फणसवाडी शाळा प्रथम



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पंचायत समिती शिक्षण विभाग आणि प्रधानमंत्री पोषण आहार योजना यांच्या माध्यमातून पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कर्जत तालुक्यातील सर्व २१ केंद्रामधून शाळांचा सहभाग राहिलेल्या या स्पर्धेत वैजनाथ केंद्रातील फणसवाडी शाळेने पहिला क्रमांक पटकावला.

प्रधानमंत्री पोषण आहार योजनेंतर्गत कर्जत तालुका शिक्षण विभागाने तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा भरवली होती. किरवली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कर्जत तालुक्यातील २१ केंद्रांतील जिल्हा परिषद शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शालेय पोषण अधीक्षक शिल्पा दास पवार खालापुर व दीपा परब, विषय साधन व्यक्ती गटसाधन केंद्र कर्जत यांनी केले. पाककृतींची पाहणी गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी केली तर स्पर्धेचे नियोजन शिल्पा पवार, रीना वैद्य यांनी केले होते.

# भुवनेश्वर कालव्यालगतची १७ घरे कायमस्वरूपी नावावर करण्याची मागणी

## खासदार सुनील तटकरे यांना दिले निवेदन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिकेचे हद्दीतील कालवा रोड भुवनेश्वर परिसरातील १७ घरे ही राज्य शासनाच्या नव्या धोरणानुसार सरकारी जमिनीवर असलेली अनाधिकृत घरे मालकिची करता येतात त्याच पद्धतीने प्रशासनाने ही १७ घरे त्यांच्या मालकीची करावी अशी मागणी रोहा नगरपालिकेचे माजी नगरसेवक समिर सकपाळ यांनी लेखी स्वरूपात पत्र खासदार सुनिल तटकरे यांच्या रविवार दि. (९) रोजी कडे दिले आहे.

दरम्यान रोहा नगरपालिकेचे हद्दीतील भुवनेश्वर परिसरातील नाना शंकर कालवा रोड लगत सर्वे नंबर २६८ /१ अ मधील अतिक्रमित शासनाची जागेची २०२१ साली मोजणी झालेले होती परंतु जागेची सुधारीत मोजणी नकाशा भुमी अभिलेख व रोहा नगरपालिका उपलब्ध नसल्याने या १७ घराचा प्रश्न प्रलंबित आहे . त्यामुळे भुमी अभिलेख रोहाचा सर्वेअर माजी नगरसेवक समीर सकपाळ , शिल्पा धोत्रे यांनी कागदपत्र उपलब्ध करुन मोजणी केली होती .



समीर सपकाळ यांनी खासदार तटकरे यांचेकडे मागणी पत्र देताच त्यांनी प्रांत ज्ञानेश्वर खुटवड यांना फोन करून सूचना देताना सांगितले की, रोहा नगरपालिकेच्या हद्दीतील भुवनेश्वर कालवा रोड लगत असणाऱ्या नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत लवकरच मिटिंग घ्यावी व हा प्रश्न मार्गी लावण्यात यावा असे आदेश खासदार सुनिल तटकरे यांनी दिले . यावेळी रोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यासह नगरसेवक व रोहा नगरपालिकेचे मुख्याधिकारी उपस्थित होते.


# भारतीय मजूर महासंघ केंद्रीय कार्य समितीची बैठक

**उरण : वार्ताहार**

भारतीय मजदूर महासंघाच्या केंद्रीय कार्यकारणीची बैठक आसाममधील गुहावटी येथे १० फेब्रुवारी पासून सुरू झाली आहे. ही बैठक १०-११-१२ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे.भारतीय मजदुर महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरण्यमय पंड्या यांच्या हस्ते या केंद्रीय कार्य समितीचे उद्घाटन झाले.

या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होऊन निर्णय होणार आहेत, यामध्ये श्रमिक संपर्क अभियान,धनसंग्रह, लेबर कोर्ट, २०२५ चे वार्षिक प्लॅन, २०२६चे राष्ट्रीय अधिवेशन,स्वावलंबन भारत अभियान ,पर्यावरण मंच, महिला समन्वय, कार्यकर्ता विकास, पंच परिवर्तन, द्वीप बैठक इत्यादी अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा विमर्ष होणार आहे.

या बैठकीस राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते, प्रभारी अण्णा धुमाळ, संघटन मंत्री गणेश मिश्रा, पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, महाराष्ट्राचे महामंत्री किरण मिलगिर, सर्व राज्यांचे महामंत्री, केंद्रीय पदाधिकारी उपस्थित आहेत.



# लोकनाट्य कला केंद्रासाठी नवी नियमावली

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात लोककला जगली पाहिजे. महाराष्ट्रातील लोकनाट्य केंद्रावर पारंपरिक वाद्ये वाजली जावी. यासाठी संस्कृतिक कार्य विभागाकडून नियमावली तयार करण्यात येईल तसेच महसूल आणि पोलिस यंत्रणेने याकामी आवश्यक ती तातडीची पावले उचलावी, यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे सांगण्यात येणार असल्याचं सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील लोक कलावंतांच्या विविध मागण्यासाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.लोकनाट्य केंद्रावर डी .जे. तसेच व साउंड सिस्टीम सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाली आहे. या कला केंद्राचे काम अटी व शर्तीनुसार होत नसेल तर जिल्हाधिकारी आणि पोलिसांनी योग्य ती कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र कला केंद्रांमध्ये लोकनाट्य व पारंपारिक लावणी शो मध्ये कलाकारांची कमतरता आहे. त्यासाठी नवीन कलाकार तयार व्हावेत यासाठी स्व.पद्मश्री श्रीमती यमुनाबाई वाईकर यांच्या नावे प्रशिक्षण सुरु करण्यात येणार आहे. यासह अन्य लोककलांची नावे पुरस्कार योजनाना देण्याबाबत विभागाने समाजातील जाणकारांच्या सूचना मागवाव्या असे ही मंत्री शेलार यांनी सांगितले.

पान १ वरुन

## शेतीमध्ये एआयचा वापर करणार

शेतकऱ्यांनी सूचना केल्या आहेत त्यातील ज्या बाबी ताबडतोब करता येण्यासारख्या आहेत त्याबात तातडीने कार्यवाही केली जाईल. ज्या धोरणात्मक बाबी आहेत त्याबाबत नंतर निर्णय घेतला जाईल. प्रत्येक गावात पर्जन्यमापक बसवणार तसेच हवामान केंद्र सुरू करण्यात येईल. सॅटेलाईटची मदत घेण्यात येईल, असेही कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

कृषी आयुक्त सुरज मांढरे म्हणाले की, शेतात जो प्रत्यक्ष काम करतो त्याच्याशी बोलूनच कृषी धारेण तयार करण्यात येईल. शेतकऱ्यांनी केलेल्या सूचनांचे पालन केले जाईल. कृषीरत्न पुरस्कार विजेते चंद्रशेखर भडसावळे, कृषीरत्न पुरस्कार विजेते अनिल पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले.

या परिसंवादास, मृद संधारण विभागाचे विस्तार संचालक रफिक नाईकवाडी, अधीक्षक कृषी अधिकार ठाणे कार्यालयातील सहसंचालक बालाजी ताटे, स्वीय सहाय्यक संतोष पाटील हेही उपस्थित होते. कोकण विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी प्रास्ताविक केले, तर रायगडच्या अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नमो चषक : रुस्तम-ए-हिंद पैलवान लाली गुरुदास पोल कुस्ती किताब विजेता

या वेळी हलगीच्या नादात खेळाडू आणि मान्यवरांचे जल्लोषात स्वागत करण्यात येत होते. एकाहून एक रोमांचक सामने, भव्य दिव्य स्वरूपात आयोजन, प्रेक्षकांची तुफान गर्दी, खणखणीत आवाजात कुस्तींचे समालोचन यामुळे वातावरण उत्साहपूर्ण होते.

वरिष्ठ मुले ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटात शुभम वरखडे याने श्रेयस करे याचा पराभव करून नमो केसरी मानाची गदा पटकावली. ७० ते ७९ किलो वजनाखालील गटात प्रतीक हातमोडे प्रथम क्रमांक, विशाल पुजारी द्वितीय क्रमांक, ६० ते ७० किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक किरण ढवळे, साजन पावशे द्वितीय क्रमांक, ५० ते ६० किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक राज पाटील, द्वितीय क्रमांक सूरज झा, ७० किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक सुदर्शन आसदर, वेदांत यलकर द्वितीय, ६५ किलो वजनाखालील गटात भूषण पवार प्रथम क्रमांक, प्रीत भोईर द्वितीय, ६० किलो वजनाखालील गटात वेदांत पाटील प्रथम क्रमांक, द्वितीय रूद्र पाटील, ५५ किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक ओम म्हात्रे, सुमित वीरकर द्वितीय, ५० किलो वजनाखालील गटात प्रथम शुभम करांडे, द्वितीय अभिषेक साह, ४५ किलो वजनाखालील गटात विश्वजीत घोगे प्रथम, सनी कुमार द्वितीय, ४० किलो वजनाखालील गटात प्रथम सुनील म्हात्रे, सोहम ढणे द्वितीय, ३५ किलो वजनाखालील गटात तनिष्क पाटील प्रथम, व नितेश मंडळ याने द्वितीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षाखालील मुलांच्या ३० किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक करण कातकरी, द्वितीय आशिषकुमार पाल याने प्राप्त केला. महिलांमध्ये ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटात रितिका कारंडे हिचा पराभव करत अमेघा घरत हिने प्रथम क्रमांक पटकावून नमो केसरी मानाची गदा मिळवली. ५० किलो वजनाखालील गटात प्रथम क्रमांक शौर्या कोळेकर, द्वितीय श्रुती कोंडविलकर, ४५ किलो वजनाखालील गटात प्रथम ईश्वरी गळवे तर द्वितीय साची महतो, ४० किलो वजनाखालील गटात निर्जला साही प्रथम, द्वितीय क्रमांक निलम कातकरी हिने मिळवला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्थायी समितीचे माजी सभापती व स्पर्धा संयोजक अमर पाटील आणि सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

रुस्तम-ए-हिंद लाली लाली गुरुदास पोल हे पंजाबमधील एक नामांकित कुस्तीपटू आहेत. त्यांनी त्यांच्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्यामुळे रुस्तम-ए-हिंद हा किताब मिळविला आहे. त्यांच्या आक्रमक आणि तंत्रशुद्ध खेळामुळे ते कुस्तीप्रेमींच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत, तर जलाल इराण आंतरराष्ट्रीय पैलवान आहे. त्याने आपले कसब दाखवत अनेक स्पर्धा जिंकत आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून ख्याती मिळवली आहे. पैलवान अमेघा घरत (पनवेल) महाराष्ट्रातील एक प्रतिभावान महिला कुस्तीपटू आहे. तिने राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून महाराष्ट्र चॅम्पियन हा किताब मिळविला आहे. महिला कुस्ती क्षेत्रात एक उगवती तारा म्हणून ती ओळखली जाते, तर पैलवान अंकिता फातले ही कोल्हापूरमधील एक कुशल महिला कुस्तीपटू आहेत. तिने विविध स्पर्धांमध्ये आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करून महाराष्ट्र चॅम्पियन हा किताब मिळविला आहे. आक्रमक खेळामुळे ती प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देत असते. अशा दिग्गज पैलवानांचा या कुस्ती स्पर्धेत सहभाग होता.

# कोल्हापूर चित्रनगरीत वस्तुसंग्रहालय बांधणार -मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

कोल्हापूर हे मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक महत्त्वाचे केंद्र आहे. याच सांस्कृतिक वारशाचे जतन व्हावे, यासाठी कोल्हापूर चित्रनगरीत लवकरच एक भव्यदिव्य वस्तुसंग्रहालय बांधण्यात येणार आहे. या वस्तुसंग्रहालयात चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील महत्त्वाचे दस्तऐवज, जुने चित्रपट, चित्रपटांचे पोस्टर्स, कॅमेरे, वेशभूषा, स्क्रिप्ट्स अशी विविध स्मृतिचिन्हे ठेवण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे.

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीसंदर्भात आज सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडे मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उपसचिव नंदा राऊत, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आदी उपस्थित होते.

कोल्हापूर चित्रनगरी येथे नवीन वस्तुसंग्रहालयात मराठी चित्रपटसृष्टीच्या समृद्ध इतिहासाचा ठेवा जपला जाणार असून, जुन्या तसेच नव्या पिढीला चित्रपटसृष्टीच्या वैभवशाली परंपरेची माहिती मिळेल असे सांगून मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने लहान लहान चित्रफिती तयार करून त्यास समाज माध्यमांवर प्रसारित करण्याच्या सूचना मंत्री ॲड शेलार यांनी केल्या.


## 'प्रयागराज रेल्वे स्टेशन व्यवस्थितपणे सुरू'

**नवी मुंबई : बातमीदार**

महाकुंभ मेळा सुरू असलेले प्रयागराज रेल्वे स्टेशन तुफान गर्दीमुळे बंद करण्यात आल्याच्या वृत्ताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खंडन केले आहे. याबाबत सोशल मिडीयाद्वारे काही अपप्रवृत्तींनी चुकीची पोस्ट करुन नागरिकांची दिशाभूल केली आहे. त्यामुळे कुणीही प्रयागराज जंक्शन रेल्वे स्टेशन बंद केल्यासंदर्भातील अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केले आहे.

## दुखवटा

### बेबीबाई कोळी



**पनवेल :** मोरावे येथील बेबीबाई अमृत कोळी (वय ५७) यांचे अलिकडेच अकस्मात निधन झाले.त्या मच्छीमार अमृत मंगळ्या कोळी यांच्या पत्नी तर गीतकार संगीतकार गायक अभिनेता प्रतिक कोळी व विवाहित कन्या सौ. प्रतिक्षा यांच्या मातोश्री होत्या.बेबीबाई यांचा दशक्रिया विधी मंगळवार १८ फेब्रुवारीस श्रीक्षेत्र लांगेश्वर मंदिर मोरावे (उलवे) येथे सकाळी ९ वा. होणार असून उत्तरकार्य शुक्रवारी २१ फेब्रुवारीस राहत्या घरी मोरावे (उलवे)येथे होणार आहे.

## निवडक

### जप्त वाहनांच्या मालकांचा शोध




**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या व विविध गुन्ह्यात जप्त असणाऱ्या वाहनांच्या मुळ मालकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दुचाकी मोटार सायकल, रिक्षा, स्कुटी गाड्या, स्वीफ्ट कार, नॅनो कार, बजाज पल्सर, युनिकॉर्न मोटार सायकल, टोयॅटा, टँकर अशा प्रकारे एकूण ८२ वाहने या पोलीस ठाण्यात असून सदर वाहन मालकांनी या संदर्भात पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा यासाठी वपोनि प्रवीण भगत ०२२-२७४१२३३३३, ९८७०३०१०९०, ९३२६४४५१०० व९०८२१२५१४१ यांच्याशी व्यक्तीशः अगर मोबाईलवर फोनवर संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि प्रवीण भगत यांनी केले आहे.

### कुत्र्याला कूर वागणूक; गुन्हा दाखल

**पनवेल :** मोटरसायकलच्या पाठीमागील गार्डला एका लोखंडी साखळीने कुत्र्याला बांधून रस्त्याने चालवित घेऊन जाणाऱ्या व कुत्र्याला क्रूर वागणूक दिल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तालुक्यातील डेरवली फाटा येथे अनोळखी व्यक्तीने कोन गावाकडून पळस्पे फाटा या दिशेने हिरो स्प्लेंडर या गाडीवरून जाताना त्याच्या मोटरसायकलच्या पाठीमागील गार्डला एका लोखंडी साखळीने कुत्र्याला बांधून रस्त्याने गेला. कुत्र्याला क्रूर वागणूक दिल्याबद्दलची तक्रार तक्रारदाराने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिल्यावर संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पत्रकार संजय कदम यांना पुरस्कार



**पनवेल :** सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संस्था, पनवेल या आपल्या संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन पनवेल येथील फडके नाट्यगृहात झाले. या वेळी पत्रकार संजय कदम यांना सिंधुरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. रमाकांत चव्हाण व संजय साटम यांना 'जीवन गौरव' आणि पत्रकार संजय कदम यांना 'सिंधुरत्न' या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्याचबरोबर यशस्वी युवा उद्योजक स्थापत्य अभियंता संतोष पोकळे, डॉ.तन्वी बांदेकर, डॉ. आशिष बांदेकर, ॲड. अमोल गावडे आणि क्रीडा क्षेत्रात यश प्राप्त केलेल्या खेळाडूंचाही सत्कार करण्यात आला.

# उरणमधील कांदळवनांचे संवर्धन गरजेचे

**उरण : रामप्रहर वृत्त**

जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उरणमधील कांदळवन विभागाच्या अखत्यारीतील दोन हजार हेक्टर कांदळवन क्षेत्राची सुरक्षा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. अनेक ठिकाणी कांदळवनाच्या जंगलावर मातीचा भराव टाकून, त्याला आगी लावून किंवा या वृक्षांवर कचरा टाकून ती नष्ट केली जात आहेत.



उरण परिसरात हजारो हेक्टर भूखंडावर कांदळवन आहे. या कांदळवनाच्या सुरक्षेची जबाबदारी सुरुवातीला वन विभागाकडे होती. त्यात बदल करून सध्या ही जबाबदारी शासनाने स्वतंत्र निर्माण केलेल्या कांदळवन कक्षाकडे सोपवली आहे. यात प्रथम वन विभाग आणि आता कांदळवन कक्ष यांच्या दुर्लक्षामुळे येथील कांदळवनाची सुरक्षाच धोक्यात आली आहे. उरण तालुक्यातील अनेक भागात रस्ते, बांधकाम, गोदाम तसेच इतर उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी कांदळवन नष्ट केले जात आहे. यात खाडीवरील बेकायदेशीर स्लूस गेट बंद केल्याने पाणथळ कोरडी पाडून कांदळवन नष्ट केली जात आहे. या संदर्भात पर्यावरणवाद्यांनी तक्रार केली आहे.

उरण आणि वाशीमध्ये मोठ्या ओल्या जमिनी आणि खारफुटीचे पट्टे गाडले जात आहेत. त्यानंतरच्या अधिकृत तपासणीनंतर नुकसानीची पुष्टी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याबद्दल कार्यकर्त्यांनी खेद व्यक्त केला आहे. आशा प्रकारच्या घटना चिंताजनक आहे कारण आंतरराष्ट्रीय जैवविविधता निर्देशांकात भारत १८० देशांपैकी १७६ व्या क्रमांकावर आहे आणि ही वेळ आली आहे. येथील जैवविविधता पुन्हा निर्माण करायला हवी, असे मत नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन.कुमार यांनी व्यक्त केले आहे. उरण तालुक्यातील अनेक ठिकाणी कांदळवन (खारफुटीची) तोडही केली जात आहे. यासाठी जेसीबीचा वापर केला जात आहे.

**सुरक्षेसाठी केवळ तीन कर्मचारी**

उरण-पनवेल परिसरातील दोन हजार ३०० हेक्टर जमीनीवरील कांदळवन क्षेत्र वन विभागाने कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित केले आहे, मात्र या क्षेत्राच्या सुरक्षेसाठी केवळ तीन कर्मचारी काम करीत आहेत, अशी माहिती कांदळवन विभागाने दिली आहे.

**कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या सुरक्षेसाठी कर्मचारी आहेत. यात वाढ करण्यात येणार आहे तसेच कांदळवन नष्ट करणाऱ्याच्या विरोधात कारवाई केली जात आहे.**
**-समीर शिंदे,**
**कांदळवन कक्ष अधिकारी**

## मारहाणीसह चोरी करणारे तिघे ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

आरोपी यांनी एका व्यक्तीस रिक्षात बसून त्यांना निर्जनस्थळी घेऊन जाऊन मारहाण करून तसेच त्यांचे पायावरून रिक्षा घालून दुखापत करून फिर्यादी यांचा मोबाईल घेऊन पळून गेल्याबाबत गुन्हा दाखल होताच तळोजा पोलिसांनी या तीन व्यक्तींना ताब्यात घेतले आहे.



आरोपींबाबत काही एक माहिती नसताना व फिर्यादी यांना घटनेबाबत विचारता त्यांना काही एक आठवत नसल्याने आरोपीचा शोध घेणे कठीण होत्ते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक, ज्ञानोबा धुळगुंडे, हवालदार नैनेश पाटील, सावंत, मढवी, शिंदे, शिपाई उगाडे, माने, अनिल जाधव आदींच्या पथकाने आरोपीचा तात्रिक तपास व पोलीस ठाणे हद्दीतील तसेच खारघर परिसरातील ३० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज चेक करून आरोपीचा शोध घेतला.

यामध्ये मोहम्मद जुबेर खान (वय २३), ओवेस झुबेर शेख (वय १९), साजिद खाजा शेख (वय १९) यांना तळोजा गावातून ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुह्याचे अनुषंगाने तपास करता त्यानी हा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्याना अटक करण्यात आली आहे. या आरोपींच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## बांधकाम साईटवरून मालाची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील वारदोली येथील वाधवा वाईस सिटी, मॅगनोलिया बिल्डींग परिसरात ठेवलेल्या इलेक्ट्रॉनिक्स वायर व इतर साहित्याची तीन ते चार अनोळखी व्यक्तींनी लबाडीने चोरी केल्याची घटना घडली आहे.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या ठिकाणावरून जवळपास साडेतीन लाख रुपये किंमतीच्या विविध प्रकारच्या पॉलिकॅब कंपनीच्या वायरचे बंडल, आरसीसीबीचे ट्रिपर आदी माल चोरून नेला आहे. याबाबत पुढील तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

## जासई उड्डाणपुलावर अपघातात उरणमधील दोघांचा मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरणमध्ये दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत असून त्यातही मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. अपघात होऊन अनेकांना आपला जीवसुद्धा गमवावा लागला आहे. अशीच घटना उरण तालुक्यात घडली आहे.

सोमवारी (दि.१०) पहाटेच्या सुमारास उरणमधील अनिश नायर (वय २६, राहणार कुंभारवाडा, उरण), तसेच अभिजित भुवड (वय ३० राहणार बोरी उरण) हे घरी परतत असताना उरण तालुक्यातील जासई येथील उड्डाणपुलावर त्यांचा भीषण अपघात झाला या अपघातात त्या दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे.

अपघात करणारी व्यक्ति अपघात करून पळून गेल्याचा संशय पोलिसांना आहे. अपघात कसा झाला, हा अपघात कोणी केला याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

अपघातग्रस्त व्यक्तींना वेळेत उपचार मिळाल्यास अनेकांचे जीव वाचले जाऊ शकतात. त्यामुळे उरणमध्ये सुसज्ज व अत्याधुनिक सेवा सुविधाने युक्त असे हॉस्पिटल बांधावे व प्रत्येक चौकात, सर्कल मध्ये व महत्वाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, ट्रॅफिक पोलीस, ट्रॅफिक हवालदारांची नेमणूक करावी, अशी मागणी जनतेनी केली आहे.

## पनवेलमध्ये आरोग्य शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील सिटिझन्स युनिटी फोरम व बिरमोळे मेडिकल फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बिरमोळे हॉस्पिटल येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात सुमारे २०० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये क्ष किरण तपासणी, हृदय स्पंदन आलेख, रक्ताच्या, दमा आजाराच्या, अस्थि घनतेच्या व कंठग्रंथींच्या विविध चाचण्या करण्यात आल्या. प्रणव कोलगे व त्यांच्या सहकार्यांनी नेत्र तपासणी नुसार नंबरचे चष्मे बनवून दिले. शिबिरासाठी कफचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच बिरमोळे हॉस्पिटल मधील प्राजक्ता वातारे, कांचन पुजारी, केतकी बावने व सर्व कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वर्ष २०२४-२५ मध्ये मिळवलेल्या शैक्षणिक व क्रीडा उपक्रमांमधील यशाबद्दल त्यांचा गुणगौरव करण्यासाठी सोमवारी (दि.१०) पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन केले होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मृदुल निळे (राज्यशास्त्र विभाग प्रमुख मुंबई विद्यापीठ) यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गुणगौरव करून त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सन्माननीय सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहुन महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मार्गदर्शन केले व त्यांना स्मृतीचिन्ह देऊन गुणगौरव केला व अभिनंदन केले.

या वेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, निशा नायर मुख्याध्यापिका रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर, प्रभाकर जोशी सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर, प्रा. प्रवर शर्मा (समन्वयक' स्टुडन्ट वेल्फेअर समिती), प्रा. डॉ. रीत थुले, प्रा.विशाल देशमुख, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. राजश्री म्हात्रे, त्यांनी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन त्यांचा गुणगौरव केला व शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलम मोरे व प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. नीलम लोहकरे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत 'सीकेटी' च्या विद्यार्थ्यांचे यश





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भूगोल प्रज्ञाशोध केंद्रामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य, व कांस्य पदके पटकावली आहेत.

संस्थाचालक, मुख्याध्यापक, परीक्षा समन्वयक व पर्यवेक्षक यांनी उत्कृष्ट नियोजन करून परीक्षा पार पडण्यासाठी योगदान दिले. त्यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या एकूण १०१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या गटात मानसी रवींद्र बडगुजर (दहावी) सुवर्णपदक स्वराज भरत काशिद (दहावी) रौप्य पदक व अभिनव संजय शेलार (सहावी) कांस्य पदक प्राप्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनाही उत्कृष्ट नियोजनासाठी सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच भूगोल विषय शिक्षिका समीता विश्वनाथ पाटील यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार २०२४ मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




**खारघर :** जांगिड समाज नवी मुंबईच्या वतीने आयोजित श्री विश्वकर्मा जयंती महोत्सवात आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून समाजाच्या योगदानाचे कौतुक केले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, किरण पाटील आदी उपस्थित होते. अध्यक्ष संजय शर्मा, उपाध्यक्ष सुरजमल जांगिड, सचिव सुनील जांगिड, उपसचिव अशोक जांगिड आदींनी स्वागत केले.

## शालेय विज्ञान प्रदर्शनात शेखर जगताप यांचा प्रकल्प अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राकेश जैन हायस्कूल शिवकर पनवेल येथे सेवा सहयोग फाउंडेशन यांच्यातर्फे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या विज्ञान प्रदर्शनात नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील ५० शाळा सहभागी झाल्या होत्या.



शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी आणि या विद्यार्थ्यातूनच भावी शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत या उद्देशाने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात शिक्षण प्रसारक विद्यालय माध्य. नेरूळ, नवी मुंबई या शाळेचे विज्ञान शिक्षक शेखर शांताराम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्तिक इंगोले, करण गजभार, रोहित म्हात्रे या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुरक्षा विजेच्या धक्क्यापासून या प्रकल्पाला माध्यमिक गटातून पहिला क्रमांक मिळाला.

प्राथमिक विभागातून देखील शिक्षण प्रसारक विद्यालयाच्याच सुरक्षित लोकल प्रवास या प्रकल्पाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. कुमारी श्रेया सगळे, रिया पाटेकर, समृद्धी सोनटक्के या विद्यार्थिनींनी हा प्रकल्प सादर केला होता. या वेळी सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार देखील शिक्षण प्रसारक विद्यालय नेरूळ नवी मुंबई या शाळेला देण्यात आला.

शाळेच्या या उत्तुंग यशाबद्दल शिक्षण प्रसारक विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री नामदेव भगत, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता कोठेकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील आणि शाळेतील सर्व शिक्षकांनी शाळेच्या बालवैज्ञानिकांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## पिल्लई स्कूलच्या स्नेहसंमेलनात माझी वसुंधरा शपथविधी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसीएल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन तीन सत्रांमध्ये मोठ्या उत्साहात झाले.

या कार्यक्रमाचा प्रमुख आकर्षण बिंदू म्हणजे 'माझी वसुंधरा' शपथ विधी, जो महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या उपक्रमाचा भाग होता. वासांबे, मोहपाडा ग्रामपंचायतीच्या सहकार्याने पिल्लई एचओसी स्कूलने शपथविधीचे आयोजन केले.

या अर्थपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी महात्मा एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन, व्यवस्थापन प्रतिनिधी रमेश पाटील, प्राचार्य डॉ. रीमा निकाळजे आणि कार्यक्रम समन्वयक डॉ. एंजेल सुंदर यांचे विशेष योगदान लाभले.

कार्यक्रमात ग्रुप ग्रामपंचायत वासांबेच्या सरपंच उमा संदीप मुंढे, माझी वसुंधरा समन्वयक रजनी विनायक गायकवाड आदींची उपस्थिती लाभली.



## संपादकीय

# तोडगा काढण्याचे आव्हान

वांशिक हिंसाचारात धुमसत असलेल्या मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी रविवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सिंह यांच्या राजीनाम्यानंतर आता तेथील पेचावर तोडगा काढण्याच्या दिशेने काय पावले उचलली जातात ते पहावे लागेल. अर्थातच तोडगा काढणे सोपे काम नाही. प्रदीर्घ संघर्षानंतर राज्यातील मैतेई आणि कुकी या जमातींमधील अविश्वासाची दरी प्रचंड रुंदावली आहे.

**मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी रविवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली व दिल्लीहून मणिपूरला परतल्यानंतर लगेचच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. राजकारणासाठी मणिपूरच्या भूमीचा वापर करू नका असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी वेळोवेळी विरोधकांना केले आहे. अर्थातच त्याला विरोधकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. केंद्रसरकारच्या अनेक प्रयत्नांनंतरही मणिपूरमधील हिंसाचार उफाळतच राहिला. तेथील मैतेई आणि कुकी या दोन समाजांमधील संघर्षातून हा हिंसाचार झाला. तो थांबवण्यात अपयश आल्याबद्दल सिंह यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून होत होती. वास्तविक मणिपूरमधील सध्याचा संघर्ष हे काँग्रेसचेच भूतकाळातील पाप आहे. यापूर्वी काँग्रेस काळातही प्रदीर्घ काळ ईशान्य भारतात रक्तरंजित हिंसाचार घडला होता. तेव्हा तो हाताळण्यात काँग्रेस अपयशी ठरली होती. याउलट महिनाभरापूर्वी बिरेन सिंह यांनी राज्यातील हिंसाचार आणि जीवितहानीबद्दल जनतेची माफी मागितली होती. ३ मे २०२३ पासून मणिपुरात हिंसाचारात सुरू होता. गेले संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला याबद्दल खूप वाईट वाटते असे सिंह यांनी म्हटले होते. गेल्या महिन्याभरापासून मणिपूरमध्ये शांतता आहे. हिंसाचाराची कोणतीही घटना घडलेली नाही. जनजीवन हळूहळू पूर्ववत होत आहे असे म्हणायला वाव आहे. परंतु तरीही राज्यातील प्रदीर्घ हिंसाचाराबद्दल बिरेन सिंह यांच्यावर दबाव होता. सोमवारपासून मणिपूर विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार होते. परंतु आदल्याच दिवशी बिरेन सिंह यांनी राजीनामा दिल्यामुळे हे अधिवेशन आता रद्द करण्यात आले आहे. या अधिवेशनात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी केली होती असे सांगितले जाते. वास्तविक मणिपूरमधील मैतेई आणि कुकी या दोन समाजांमधील संघर्षावर तोडगा काढण्याचे आव्हान मोठे आहे. सोबतच मणिपूरची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अखंडता राखणेही महत्त्वाचे आहे. सीमेवर होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने धोरण तयार करावे अशी विनंती सिंह यांनी राजीनामा देताना केंद्राला केली आहे. मणिपूरमधील ड्रग्ज दहशतवादाविरोधात लढाईही सुरूच राहणार आहे. अनिवार्य बायोमेट्रिक तपासणीसह सुरक्षित, नवीन 'एमएफआर' प्रणाली लागू करण्याचे, तसेच सीमेवरील जलद विकासकामही केंद्र सरकारने सुरु ठेवावे असे आवाहनही बिरेन सिंह यांनी आपल्या राजीनामापत्रात केले आहे. राज्यपालांनी सिंह यांचा राजीनामा स्वीकारला असून नवा मुख्यमंत्री नेमला जाईपर्यंत हंगामी मुख्यमंत्री म्हणून काम पाहण्याची विनंती त्यांना केली आहे. मणिपूरचे विभाजन मैतेईंना कबूल नाही आणि कुकी जमातीतील लोक स्वायत्ततेची मागणी लावून धरत आहेत. या दोन्ही समुदायांशी बोलणी करण्याचे मोठे आव्हान केंद्र सरकारसमोर आहे. दोन्ही बाजूच्या टोळ्यांकडील शस्त्रसाठा आधी परत मिळवावा लागेल. म्यानमारमधून होणाऱ्या घुसखोरीकडेही केंद्राला लक्ष द्यावे लागेल. या पार्श्वभूमीवर कुकी आणि मैतेई यांच्यात परस्परांविषयी विश्वास निर्माण करण्याचे आव्हान मोठे आहे.**

# महामार्ग पूर्ण होण्याआधीच पडू लागले खड्डे





**खबरबात**
**महेश शिंदे**

मुंबई–गोवा महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाच अनेक ठिकाणी या काँक्रिट रस्त्यावर खड्डे पडू लागले आहेत. यामुळे महामार्गाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. महामार्गाची देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदार कंपनीचे असली तरी पडणाऱ्या खड्ड्यांनी वाहनांचे नुकसान होत आहे.

मुंबई–गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम गेली दशकापासून सुरू आहे. पहिल्या टप्प्याचे काम वाया गेल्यानंतर या ठिकाणी पुन्हा काँक्रीट काम सुरू करण्यात आले आहे. तर इंदापूर पासून कशेडी पर्यंत असलेल्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आजही अनेक ठिकाणी महामार्गाचे काम अपूर्णच आहे. महाड पासून पोलादपूर पर्यंत काँक्रीट चे काम पूर्ण झालेले असले तरी घिसाड घाई करत केलेल्या कामामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडणे तसेच काँक्रीट निघून जाऊ लागल्याने रस्त्यावर खडबडीतपणा निर्माण झाला आहे. इंदापूर ते कशेडी या दरम्यान माणगाव जवळचा बायपास रस्ता तसेच लोणेरे पासून टेमपाले गावापर्यंतच्या रस्त्याचे काम विविध कारणांमुळे अपूर्ण अवस्थेत आहे. यामुळे तयार झालेल्या रस्त्यावरून वेग पकडणाऱ्या वाहनांना या ठिकाणी अचानक ब्रेक लागत आहे. त्यातच अनेक ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडू लागले आहेत. लोणेरे गावापासून टेमपाले गावापर्यंत उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या पर्यायी रस्त्यावर वाहने वळविण्यात आले आहेत मात्र या पर्यायी रस्त्याची देखील चाळण झाली आहे यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे.

मुंबई–गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यामध्ये पनवेल पळस्पे ते इंदापूर दरम्यान रस्त्याचे काम सुरू करण्यात आले होते. या डांबरीकरणांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याने रस्त्याचे अल्पावधीतच वाटोळे लागले. महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू होत असतानाच पहिल्या टप्प्यात असलेला मार्ग पूर्णपणे खड्ड्यात गेला. गणेशोत्सवामध्ये हे रस्ते दुरुस्त करण्यावर शासन भर देत होतं. मात्र तरी देखील गणेश भक्तांची नाराजी कायमच होती. या रस्त्याचे डांबरीकरण रद्द करून यावर आता काँक्रीट रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या काँक्रीट रस्त्यामुळे वाहन चालक समाधान व्यक्त करण्याऐवजी काँक्रीट रस्त्याच्या कामावर नाराजीच अधिक निर्माण होत आहे. काँक्रेटर रस्त्यावरील असमतल पातळी, पडणारे खड्डे, पुलांवरील जोड, अपूर्ण दुभाजक, हॅलो साईड पट्ट्यांना पडलेला कचरा अधिकारांमुळे काँक्रीट रस्ता वाहन चालकांसाठी धोकादायकच बनला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांचे काम अपूर्ण असल्याने अचानक वाहने वळवली जात आहेत. वेगाने येणाऱ्या वाहनांना समोरील बंदरस्ता पाहून अचानक ब्रेक लावावा लागत आहे. यामुळे चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास आले असे प्रशासन म्हणत असले तरी आजही देखील अपघात होऊन मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या शून्य झालेली नाही.

महामार्गाच्या कामामध्ये संबंधित ठेकेदारांनी केलेल्या कामावर वाहन चालक नाराज आहेत. अनेक ठिकाणी काँक्रीट चा भाग निघून जाऊन खडबडीतपणा निर्माण झाल्यामुळे कंपन्यांना महामार्गावरील काही भाग फोडून होणार असता करण्याची पाळी आली आहे. यामुळे आजही अनेक ठिकाणी रस्ता पूर्ण झाल्यानंतर अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अचानक रस्ता बंद करावा लागत आहे. एकीकडे देशांमध्ये मोठमोठे प्रकल्प पूर्णत्वास नेले जात असताना मुंबई पासून निघणारा गोव्यापर्यंत जाणारा हा महामार्ग पूर्ण होण्यास अजून किती वर्ष वाट पहावी लागणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रत्येक गणेशोत्सवामध्ये या परिस्थितीमुळे वाहन चालकांना आपली वाहने मुंबई व महामार्ग ऐवजी कोल्हापूर वरून मार्गस्थ करावी लागत आहेत. यामुळे महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जावे आणि त्याची गुणवत्ता सुधारावी अशी मागणी वाहन चालकांकडून केली जात आहे.

# चौलची जागृत चंपावती देवी उपाख्य कालिका माता

रायगड जिल्हातील अलिबागच्या दक्षिणेस १८ किलोमीटर असलेल्या चौलमध्ये वाघजाईच्या डोंगरातील सातवाहन काळातील लेणी त्या काळाचे चौलशी नाते दाखवते. चौल जगाच्या नकाशातील एके काळचे भरभराटीचे बंदर, इजिप्त,ग्रीस,चीन आणि आखातातील देशांकडे याच बंदरातून व्यापार होत असेत्र त्याकाळी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी उदयास आलेले हे बंदर पोर्तुगीजाचे महत्वाचे ठाणे, निजामशाही, आदिलशाही, आणि मराठेशाही जवळून पहाणारे नगर होते...! येथे ३६० मंदिरे व तितकेच तलाव असा इतिहास या ठिकाणी आहे. चंपावती नगर अशी ख्याती असलेले चौलची ऐतिहासिक काळापासून दक्षिण काशी अशी ओळख सांगितली जात असे.

चौलनाका येथून चौलचौकी नजीक चंपावती आळीत भव्य चंपावती देवीचे मंदिर आहे. हे मंदिर सुमारे चारशे वर्षापुर्वीचे असावे असे सांगितले जाते, या देवीला ' कालिका माता' या नावाने सुध्दा ओळखतात. या चंपावती देवीवर कोळी समाजाची अपार श्रध्दा आहे, ऐतिहासिक काळात मंदिर परिसरात फक्त सोनचाफ्याची झाडे होती. त्यामुळेच या देवीला चंपावती हे नाव पडले असावे



असा जाणकार मंडळी सांगतात. ही चंपावती देवी साहनी कुटूंबाची कुलदैवत आहे. या देवस्थानाचा जिर्णोध्दार १५ जुन १८७२ साली झाला, असा उल्लेख आंग्रेकालीन अष्टागर या पुस्तकात आढळतो. इ.स.१९६७ मध्ये कोयना भुकंपात या देवस्थानाची थोडीफार नुकसानकी झाली. त्यामुळे या मंदिरास जिर्णोध्दाराची परत एकदा गरज भासली. त्यावेळी मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी दैनिक फंड योजना अंमलात आणली. जयवंत साहानी यांनी काही वर्षापुर्वी देवालयातील देवी समोरचा चोल स्वखर्चाने मार्बलने आच्छादीत केला. साहानी कुंटूबिया दर दोन वर्षानी श्री चंपावती देवी दर्शन सहलीस येतात. साहानी कुटूंबियांनी सन २००३ मध्ये सिमेंट क्रॉकिटच मंदिर बांधून भव्य कळसासह जिर्णोध्दार केला. मुख्य गाभार्यात चौधरा आहे. या मंदिरात अश्विनी महिन्यात नवरात्र उत्सव, गुढीपाडवा, रामनवमी उत्सव साजरे केले जातात. हल्ली मंदिराची मालकी श्रीमती महानंदा नाईक यांच्याकडे असून त्या पुजाअर्चा करतात. उत्सवाचे दिवशी चंपावती मातेस मुखवटा व दागिन्यांनी सजवण्यात येते. या मंदिराच्या गाभार्यात श्री हनुमान, दत्तमुर्ती, व गणपतीची मुर्ती आहे. या मंदिरात कोळी, माळी, गुजराती समाजातील कुटूंबिय मोठया प्रमाणावर दर्शनाला येतात. साहानी कुटूंबियांनी सन २०१० मध्ये मुर्तीला वज्रलेप केला आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात कमी होणार नाही कारचे मायलेज, 'हे' करा...

नवीन कार खरेदी करत असताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण गाडीचे मायलेज किती आहे हे पाहिले जाते.




खरे तर, ज्या कारला मायलेज चांगले असते, ती कार खरेदी करण्याला लोकपसंती देतात. मात्र, उन्हाळ्यामध्ये गाडीचे मायलेज कमी होते, उन्हाळयामध्ये एसीशिवायचा प्रवास हा खूप अवघड होऊ शकतो. उन्हाळ्यापासून वाचण्यासाठी आणि प्रवास आरामदायी होण्यासाठी एसीचा वापर करतात. गाडीचा एसी जेवढ्या जास्त प्रमाणात वापरला जाईल, तितकेच मायलेज कमी होते. एसी सुरू असल्याने गाडीमध्ये असलेल्या इंजिन किंवा मोटरवर ताण येतो. अशामध्ये ते मेंटेन करण्यासाठी इंजिनला आधी ताकद निर्माण करावी लागते. त्यासाठी इंजिन इंधनाचा वापर करते.

वाहनाच्या कमी मायलेजला ड्रायव्हिंग स्टाईलही कारणीभूत आहे. विनाकारण गाडी सुरू ठेवणे, क्लच, गिअर व ब्रेकचा योग्य वेळी वापर न करणे या गोष्टींमुळेही गाडीचे मायलेज कमी होऊ शकते.गाडीच्या चाकांमध्ये पुरेशी हवा नसली तरीदेखील मायलेज कमी होण्याची शक्यता असते. चाकांमध्ये हवेचा दाब कमी असतो तेव्हा गाडी चालवताना इंजिनवरील दाब वाढतो. त्यामुळे इंधनाचा जास्त वापर इंजिनाकडून केला जातो. त्यामुळे मायलेज कमी होऊ शकते. तसेच गाडीचा मेंटेनन्स वेळेत केला गेला नाही तरीदेखील मायलेजवर परिणाम होऊ शकतो.

उन्हाळ्यात प्रवास करताना एसीचा वापर हा अत्यावश्यक असतो. उन्हाळ्यात कारचा एसी सतत वापरल्याने मायलेजवर परिणाम होतो. त्यामुळे आवश्यक असेल तेव्हाच एसीचा वापर करा म्हणजे मायलेजदेखील कमी होणार नाही.

जर का तुमची गाडी खूप काळापासून बंद असेल आणि आतून गाडी उन्हामुळे खूप तापली असेल, तर एसी सुरू करण्यापूर्वी गाडीच्या खिडक्या उघडा आणि आतील गरम हवा बाहेर जाऊ द्या. त्यासाठी तुम्ही गाडीतील पंखादेखील वापरू शकता. गरम हवा बाहेर गेल्यावर एसी सुरू करा. सुरुवातीला पूर्ण क्षमतेने एसी सुरू करू नये. गाडीला हळूहळू थंड होऊ द्या. तुमच्या गाडीला सनरूफ असेल, तर ते व्यवस्थित बंद ठेवावे. उन्हाळ्यामध्ये तुम्ही तुमची गाडी शक्यतो सावलीत उभी त्या ठिकाणी उभी करावी करावा. त्याशिवाय आपल्या गाडीचा मेंटेनन्स वेळोवेळी करणे आवश्यक आहे. तसेच काही थोड्या थोड्या दिवसांनी गाडीच्या चाकांमधील हवादेखील तपासून पाहावी.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय



## निमित्त

भारतीय जनता पक्ष सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा ११ फेब्रुवारीला स्मृतीदिन आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एक हिंदुत्ववादी विचारवंत आणि भारतीय राजकारणी होते. त्यांनी हिंदू शब्दाचा अर्थ धर्मानुसार नव्हे तर भारतीय संस्कृतीच्या रुपात सांगितला. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होते. शिवाय भारतीय जनसंघाचे अध्यक्ष होते. त्यांनी राजकारणाशिवाय भारतीय साहित्यात योगदान दिले. त्यांनी लिहिलेल्या सम्राट चंद्रगुप्त नाटक बहुतेकांना आवडले. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने भारतीय जनसंघाची स्थापना केली. नागपुरात दीनदयाळ उपाध्याय थाली सुरू करण्यात आली. याचे श्रेय माजी महापौर संदीप जोशी यांना आहे. ही थाली मेडिकल येथील रुग्णाच्या नातेवाईकांना पुरविली जाते. हजारो रुग्णांचे नातेवाईक या थालीचा लाभ घेतात. अशाप्रकारे देशभर दीनदयाळ उपाध्याय यांना मानणारे नागरिक आहेत.

२५ सप्टेंबर १९१६ रोजी उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यात दीनदयाळ उपाध्याय यांचा जन्म झाला. वडील भगवती उपाध्याय भारतीय रेल्वे विभागात नोकरीला होते. आई रामप्यारी यांनी त्यांचा सांभाळ केला. पंडित दीनदयाळ यांचे आईवडील धार्मिक होते. दीनदयाळ यांचे आजोबाही रेल्वेमध्ये स्टेशन मास्टर होते. लहानपणीचं त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. सात वर्षांचे असताना आईही आजारपणात गेली. याचा फार मोठा आघात त्यांच्या बालमनावर झाला.

भारतीय जनसंघ पार्टीचे सह–संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ मध्ये भारतीय जनसंघ पार्टीची स्थापना केली. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघ पार्टीचे सह–संस्थापक होते. १९५३ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाची जबाबदारी दीनदयाळ यांच्यावर आली. सुमारे पंधरा वर्षे संघटन महामंत्री म्हणून काम केल्यानंतर १९६७ मध्ये ते जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ मध्ये रेल्वे यात्रेदरम्यान दीनदयाळ यांच्या मृत्यूने देश हादरला. त्यांच्या रहस्यमय मृत्यूने काही प्रश्न निर्माण झाले होते. कारण त्यांचा मृतदेह उत्तर प्रदेशातील मगलसराय रेल्वे स्टेशन लाईनवर सापडला होता. दीनदयाळ यांचा मृत्यू नेमका कसा झाला, हे रहस्य अद्याप कायम आहे.

१० फेब्रुवारी १९६८ रोजी संध्याकाळी दीनदयाळ लखनौवरून पटणाला जाण्यासाठी सियालदाह एक्सप्रेसमध्ये बसले होते. त्यांची ट्रेन मध्यरात्री दोन वाजता मुगलसरायला पोहचली. परंतु, तिथं दीनदयाळ नव्हते. ट्रेन आल्यानंतर दहा मिनिटांनी त्यांचा मृतदेह सापडला होता. त्यांच्या हातात पाच रुपयांची नोट होती. त्यांना जौनपूर येथे मध्यरात्री पाहिले गेले होते. त्यांच्या मृत्यूचा तपास सीबीआयने केला. सीबीआयने भरतलाल आणि त्यांच्या सहकाऱ्याला त्यांच्या हत्येच्या आरोपात अटक केली गेली. चोरी केल्यानंतर दीनदयाळ यांना ट्रेनमधून धक्का मारून बाहेर फेकले असावा, असा अंदाज आहे.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुरीच्या डाळीचे विविध आरोग्यदायी फायदे

वरण किंवा आमटी सहसा तुरीची किंवा मुगाची केली जाते. चण्याच्या डाळी ऐवजी काहीजण तुरीच्या डाळीपासून पुरण बनवतात आणि त्यापासून बनवलेल्या पुरणपोळ्या तुपाबरोबर सेवन केल्या जातात. त्यासुद्धा अतिशय रुचकर लागतात.

दक्षिण भारततही सांबर किंवा रसम करण्यासाठी तुरीच्या डाळीचा वापर केला जातो. काही पित्त प्रकृतीच्या व्यक्तींना



तुरीचं वरण किंवा आमटी खाल्ली की त्रास होतो, पण त्या व्यतिरिक्त तूर हे कडधान्य रोजच्या आहारात असणं चांगलं असतं.

तुरीची डाळ कृमीनाशक म्हणजे जंताचा नाश करणारी असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शरीरातल्या कफदोषाला आणि अवाजवी प्रमाणात वाढलेल्या मेदाला कमी करणारी असते. त्यामुळे वजन कमी करायचं असेल तर संध्याकाळच्या जेवणात तुरीची पातळ आमटी आणि ज्वारी, बाजरीची भाकरी खाणं उत्तम आहे.

तुरीचं वरण किंवा आमटी बनवण्यासाठी डाळ शिजताना त्यात थोडं जास्त पाणी घालावं, डाळ छान शिजली आणि पातेल्याच्या तळाशी गेली की वरचं पाणी काढून टाकावं. तुरीची डाळ अधिक पथ्यकर असते. जखम भरून आल्यानंतर किंवा त्वचारोग बरा झाल्यानंतर कधी कधी त्वचेवर डाग शिल्लक राहतात. यावर तुरीची डाळ शिजत असताना त्यात हळकुंड टाकावं आणि नंतर ते उगाळून त्याचा लेप लावावा. यामुळे त्वचेचा वर्ण पुन्हा पुर्ववत होण्यास मदत मिळते.

पचन संस्था चांगली आणि निरोगी आरोग्यासाठी आपल्या आहारामध्ये तुरीच्या डाळीचा समावेश करा. तसेच पचनयोग्य तंतुमय पदार्थांसाठी आणि निरोगी आहारासाठी तुरीची डाळ चांगली असते.

वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारामध्ये तुरीची डाळ समावेश करू शकता आणि ते तुमच्यासाठी फायदेशीर आहे. तसेच तुरीच्या डाळीमध्ये पोषक घटकही जास्त प्रमाणात आहेत.

अनेकांना जळजळ होण्याची समस्या सारख्या जाणवत असतील तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करू शकता. तसेच डाळीच्या सेवन केल्यास जळजळ होणे हे त्रास कमी होते. तर पाईल्सची समस्या असेल तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करा.

# जिताडा व्हिलेज योजना पुन्हा सुरू करणार -कृषीमंत्री कोकाटे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयाच्या खारेपाट भागात रायगड जिल्हा प्रशासनाने सुरू केलेली जिताडा व्हिलेज ही योजना बारगळली आहे ती पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ही योजना राबवण्यात काही अडचणी येतात का याची पडताळणी केली जाईल जर अडचणी नसतील तर ही योजना राबवण्यात आम्हाला काही अडचण येणार नाही. जिताडा मासे व्यवसायातून जर देशाला परकीय चलन मिळणार असेल तर त्याचा नक्की विचार केला जाईल असं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केलं.



राज्याचे नवीन कृषी धोरण ठरविण्यासाठी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे विभागवार आढावा बैठका घेत आहेत. तेथील प्रगतीशील शेतकर्यांशी संवाद साधत आहेत. त्यांना येणार्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. कोकण विभागाची ही बैठक सोमवारी अलिबाग येथील नियोजन भवन सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी या बैठकीला ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रगतीशील शेतकर्यांना बोलविण्यात आले होते. राज्याचे कृषी आयुक्तां सु र मांढरे, कोकण कृषी संचालक अंकुश माने हे देखील या बैठकीला उपस्थित होते. या शिवाय कोकण विभागातील कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

या परिसंवादाला कोकणातील पाचही जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते. त्यांनी आपल्या सुचना केल्या. समस्या मांडल्या. त्याचबरोबर कोकण कृषी विद्यापिठाबाबत तक्रारींचा पाढाच वाचला. त्यामुळे या परिसंवादसाठी उपस्थित असलेल्या कोकण कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांची बोबडी वळाली. शेतकर्यांनी विचारलेल्या प्रश्नांना ते समाधानकारक उत्तर देऊशकेल नाहीत. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी याची दखल घेत कोकण कृषी विद्यापिठाच्या अधिकार्यांची कान उघाडणी केली.

कोकणातील खारजमिनींची नोंद सातबारा उतारयांवर नसल्याने या जमिनींवर राबवण्याच्या योजना किंवा उपाय योजना यासाठी आवश्यक तरतूद होत नाही शिवाय या खारजमिनीत जी भातशेती होते त्याचे नुकसान झाल्यास सरकारी मदत मिळत नाही. यासंदर्भात महसूल विभागाशी समन्वय साधून त्यावर शेतजमीन अशी नोंद करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असं कोकाटे यांनी स्पष्ट केलं.

स्थानिक काजूपेक्षा आयात केलेला काजू स्वस्त पडतो हे लक्षात घेवून काजूवरील आयातकर वाढवण्यासंदर्भात आम्ही केंद्र सरकारला सुचित करणार असल्याचे कोकाटे यांनी सांगितलं.

# थेरोंडा खंडेरावपाडा किनारी आगीत झोपडी, मच्छीमार जाळी खाक

**रेवदंडा: प्रतिनिधी**

मौजे थेरोंडा खंडेरावपाडा समुद्र किनारी असलेल्या झोपडीला आग लागून झोपडीसह मच्छीमार जाळी जळून खाक झाल्याची दुर्दे वी घटना घडली, या आगीचे कारण अद्याप समजले नाही.



थेरोंडा खंडेरावपाडा समुद्र किनारी दि. ९ फेब्रुवारी रोजी रात्री २.३० चे सुमारास दत्तात्रेय पोसणे यांचे नाव असलेल्या झोपडीला आग लागली, यावेळी आग आटोक्यात आणण्याचा थेरोंडा खंडेरावपाडा ग्रामस्थ व विष्णू पोसणे आदी यांनी केला परंतू या आगीमध्ये यामध्ये विष्णू पोसणे यांची रूपये २ लाख ४० हजार रू किमंतीची तसेच त्याचा चुलत भाउ प्रकाश पोसणे यांची रूपये ८५ हजार ५०० रूपये किमंतीची पापलेट,कोळंबी, मांदेली, भिंजी,सोलट, आदी विविध प्रकारची मच्छीमारीची जाळी, व जुनी झोपडी अंदाजे रूपये ५ हजार रूपये किमंत असे एकूण ३ लाख २५ हजार ५०० रूपय किमंतीचा मुद्देमाल जळून खाक झाला.

या आगी बाबत विष्णू दत्तात्रेय पोसणे यांनी रेवदंडा पोलिस ठाणे येथे अकस्मात आगीची नोंद केली आहे. व या आगीबाबत कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी नमुद केले आहे. या आगीबाबत व नुकसानीबाबत मत्सव्यवसाय विभागाकडे माहिती देण्यात आली असून मत्सविभागाचे परवाना अधिकारी महादेव नांदोस्कर यांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला आहे.

या आगी बाबत मच्छीमाराच्या जय मल्हार कोळी समाज संघटना अध्यक्ष गोरखनाथ नवरीकर यांनी थेरोंडा व रेवदंडा समुद्र किनारी सिसिटिव्ही बसवावे अशी मागणी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे केली होती. परंतू यांची पुर्तता न झाल्याचे त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# श्रीवर्धन तालुक्यातील हराच्या झाडू व्यवसायाचा उत्थान आणि अस्तित्वाचा संघर्ष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात माडाच्या झापापासून पात्या वेगळ्या करून घरगुती उपयोगासाठी हिराचे झाडू तयार करण्याचा पारंपरिक आणि महत्त्वाचा व्यवसाय हळूहळू नष्ट होतो आहे. ह्या व्यवसायामुळे अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत होता, परंतु आता वयोमानानुसार परंपरागत वळेकरी कामगार निवृत्त होत आहेत, आणि नव्या पिढीने या व्यवसायाकडे पाठ फिरवली आहे. परिणामी, तालुक्यात हिराच्या झाडूंची उपलब्धता कमी झाली आहे आणि स्थानिक बाजारपेठेत त्याची मागणी घटली आहे.

श्रीवर्धन तालुक्यात नारळाची लागवड अत्यंत प्रभावी आहे, ज्यामुळे माडांची लागवड देखील सामान्य आहे. प्रत्येक बागायतदाराच्या शेताच्या बांधावर माडांच्या झापांची लागवड होते. नारळाच्या उत्पादनाच्या प्रक्रियेसोबतच माडांपासून झाप काढून, त्याचा उपयोग घरगुती झाडू तयार करण्यासाठी केला जात असे. या झाडूंचे महत्त्व आर्थिक दृष्टिकोनातूनही अधिक होते कारण ते स्थानिक कुटुंबांना एक स्थिर उत्पन्न देत होते.

झाडू तयार करण्यासाठी माडाच्या झापांचे पात्यांना कोयती आणि खराळीच्या सहाय्याने वेगळे करणे लागे. हे पात्याचे तुकडे दोन ते तीन दिवस उचलून ठेवले जात, जेणेकरून ते ओले होऊन झाडू बांधण्यासाठी योग्य होईल. त्यानंतर विळी किंवा सुरीने पात्यांपासून हिरा वेगळा करून झाडू तयार केले जात. एक झाडू तयार करण्यासाठी सुमारे तीन ते साडेतीन फुटांची हिरीची झाडू बनवली जात होती.



सुक्या हिराच्या झाडूची किंमत साधारणतः ३० ते ४० रुपये असायची, तर ओल्या हिराच्या झाडूची किंमत ४० ते ५० रुपये असायची. ही प्रक्रिया अत्यंत कष्टप्रद होती, पण त्याच वेळी स्थानिक कुटुंबांच्या रोजीरोटीचा एक महत्त्वाचा स्रोत होती. पण आता या किमतींच्या तुलनेत स्थानिक बाजारपेठेत झाडू तयार करणे कमी फायदेशीर झाले आहे, आणि त्यामुळे बागायतदार व कुटुंबांचे आर्थिक गणित बदलले आहे.

### अनेक आव्हानांचा सामना

वृद्ध वळेकरी या व्यवसायातुन निवृत्त होत आहेत आणि त्याच वेळी नव्या पिढीने या कष्टप्रद कामाला नाकारले आहे. तसेच, झापांची मागणी घटल्यामुळे बागायतदार आता झाप व पात्यांचा जळवण म्हणून उपयोग करीत आहेत. त्याचबरोबर, अन्य राज्यांमधून हिराचे झाडू आयात करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, ज्यामुळे स्थानिक स्तरावर हिराच्या झाडूंची उपलब्धता कमी झाली आहे.

या पारंपरिक उद्योगाचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे. जुनी पिढी या व्यवसायात गुंतलेली असताना, नवीन पिढीने या व्यवसायाला वळण देण्यासाठी प्रयत्न कमी केले आहेत. अशा स्थितीत या पारंपरिक कलेला पुन्हा एकदा पुनरुज्जीवित करण्यासाठी स्थानिक समुदाय, सरकारी संस्था आणि समाजातील उत्साही लोकांनी एकत्र येऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे. यावर लक्ष ठेवून, श्रीवर्धन तालुक्यातील हिराच्या झाडू व्यवसायाला नवा आकार देणे आणि त्याच्या सांस्कृतिक व आर्थिक महत्त्वाचे पुनरावलोकन करणे आवश्यक ठरेल.

आज श्रीवर्धन तालुक्यात हिराच्या झाडू व्यवसायाच्या उत्थानासाठी आवश्यक ते प्रयत्न करतांना, त्याचा अस्तित्व जपणं महत्त्वाचं आहे. झाडू बांधणीचा पारंपरिक व्यवसाय हे एक सांस्कृतिक ठेवा आहे, आणि त्याचे संरक्षण करणे हे समाजाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे कार्य ठरेल.

बागायतदारांकडून झाप खरेदी करताना वळेकरींचा व्यवहार अत्यंत अर्थपूर्ण असायचा. तयार एक झाडू तयार करण्यासाठी दहा ते पंधरा रुपये मिळायचे. पात्या बागायतदाराने काढून दिल्यास तीस रुपये, तर बागायतदाराने फक्त हिर दिल्यास दरावर घासाघीस होत असे. अनेकदा बागायतदाराने स्वतःसाठी झाडू तयार करण्यास सांगितल्यास, एका झाडूची बांधणी वळेकरीसाठी चाळीस रुपये आणि हिराच्या पात्यांसाठी अतिरिक्त शुल्क आकारले जात असे.

# जनसामान्यांच्या प्रेमामुळे नामदार झालो –ना. भरत गोगावले

## आमदार प्रवीण दरेकर, प्रशांत ठाकूर, निरंजन डावखरे यांची उपस्थिती







**पेण : प्रतिनिधी**

लोकांच्या प्रेमामुळे आज मी चार वेळा आमदार व नामदार झालो असे प्रतिपादन प्रतिपादन रोजगार हमी योजना, खारभूमी विकास कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केले.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जयभवानी वाशी, वरसुआई वाशी व वैकुंठदादा पाटील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा अजिंक्यपद व प्रौढ गट पुरुष व महिला जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन वाशी, वढाव रोड जवळील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर करण्यात आले होते. यावेळी नामदार गोगावले यांनी उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या या स्पर्धेला आमदार प्रविण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे आदींनी उपस्थिती लावुन शुभेच्छा दिल्या. वैकुंठ पाटील व त्यांच्या सहकार्यांचे अभिनंदन केले.

यावेळी मंत्री गोगवले यांनी सांगितले की, घर मोठे असण्यापेक्षा मन मोठे असले पाहिजे. माणूस मोठा झाला तरी त्याने जमिनीवर चालले पाहिजे. हवेत चालणारा पडतो. आम्ही गरिबांचे शेठ आहोत सरपंच ते आमदार व नामदार झालो पण कधी सत्तेची हवा डोक्यात जाऊ दिली नाही. लोकांबरोबर राहून त्यांची कामे केली यामुळे चौथ्यांदा आमदार होऊन चौकार मारला आहे. नियत आणि नीतिमत्ता चांगली पाहिजे तर कोणी तुम्हाला हरवू शकत नाही

यावेळी युवा नेते वैकुंठदादा पाटील मित्र मंडळाचे आयोजक वैकुंठ पाटील, सचिव मिलिंद पाटील आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. यावेळी नामदार भारत गोगावले यांनी स्पर्धेला उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देत खेळाचा आनंद लुटला.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर निविदा**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील जैवविविधता व्यवस्थापन आराखडा (Biodiversity Management Plan - BMP) तयार करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत तातडीने इच्छुक पुरवठा धारक/ व्यक्ती यांचेकडून जाहीर निविदा मागवित आहेत.

संबंधितांनी त्यांची सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दि.१७/०२ /२०२५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करावी. सदर तारखेनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा प्रपत्रकाची किंमत | अनामत रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील जैवविविधता व्यवस्थापन आराखडा (Biodiversity Management Plan - BMP) तयार करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत. | रु.५९०/- (GST सह) | ९६००/- | कार्यादेश दिल्या पासून १२ महिन्यांचा कालावधी असेल. |

**अटी व शर्ती**

१) जाहीर निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.
२) निविदेच्या अटी व शर्ती आणि इतर माहिती पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात पाहावयास मिळतील.
३) नमूद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ट असावेत.

दिनांक : १०/०२/२०२५

जा.क्र/पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र. ५७/५७/२०२५

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका


# बैलगाडा संघटना व गोरक्षक यांच्यामध्ये बैठकीचे आयोजन

**खोपोली : प्रतिनिधी**

गोरक्षक आणि बैलगाडा मालक यांच्या मधील संघर्ष खालापूरात वाढत असून गैरसमजुतीतून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे बैलगाडा संघटना व गोरक्षक यांच्यामध्ये बैठकीचे आयोजन खालापूर पोलीस ठाणेतर्फे करण्यात येणार आहे.

कर्जत खालापूर तालुक्यात शर्यतीचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जात आहे. शर्यतीच्या ठिकाणी बैल नेण्यासाठी टेम्पो, पीकअपचा वापर केला जातो. आठवड्यापूर्वी शर्यतीसाठी टेम्पोतून बैल नेत असताना गोरक्षकाने हटकल्याने वाद निर्माण झाला होता.

खालापूर परिसरात मोठ्या प्रमाणात कत्तलीसाठी जनावर चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याने गोरक्षक अशा घटनांवर लक्ष ठेवून असतात तसेच रात्रीच्या वेळेस देखील गुरांची हत्या करून त्यांचे मांस नेण्याचे प्रकार घडल्याने गोरक्षक परिसरात पहारा देत असतात. कत्तलीसाठी गुरे नेताना शर्यतीसाठी बैल नेत असल्याचा बनाव गोरक्षकाने हाणून पडला होता. गुलाल टाकून पिकअप मधून कत्तलीसाठी गुरे नेत असल्याने या प्रकरणी गुन्हा देखील दाखल झाला होता, परंतु अशा घटनेमुळे खऱ्या शर्यत प्रेमींना फटका बसत असून त्यांच्याकडेही संशयाने बघितले जात असल्याने संघर्ष वाढला आहे.

# राजिप शाळेच्या दुरूस्तीसाठी आमदार निरंजन डावखरेंना निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतींकडे दुर्लक्ष झाले असून पावसाळ्यात त्याचा अनेक विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.त्याच बरोबर सोयीसुविधेची वानवा दिसत असून आपल्या माध्यमातून दुरुस्ती व सोयीसुविधासाठी निधी उपलब्ध करावा असे साकडे आमदार निरंजन डावखरे यांना घालण्यात आले आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांची बीजेपी खालापूर तालुका तालुका मंडळ अध्यक्ष सनी यादव व कार्यकर्ते यांनी भेट घेवून तालुक्यातील असलेल्या शाळेच्या समस्या पाढा वाचुन त्यांना त्याबाबत निवेदन दिले .

आमदार डावखरे यांनी निवेदन स्विकारुन तालुक्यातील ग्रामीण भागातील राजिप शाळेच्या दुरवस्था संदर्भात चर्चा केली. लवकरात - लवकर ज्या ठिकाणी शाळेच्या समस्या असतील तेथे लक्ष्य वेधले जाईल.असे आश्वासन उपस्थित बीजेपी कार्यकर्त्यांना दिले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुकास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.




**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ६६/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक २३/०१/२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... मासिक फोटो वॉटर मीटर रीडिंग घेण्यासाठी आणि पाणी बिल आणि नोटिसांचे वितरण करण्यासाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी सेवा पुरविणे. | ₹ ७,७३,७८७.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## निवडक

### विजय चौगुले शिवसेना उपनेतेपदी



**नवी मुंबई :** शिवसेनेचे नवी मुंबईचे नेते विजय चौगुले यांची शिवसेना उपनेतेपदी निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याबाबतची घोषणा केली. दुसरीकडे ऐरोली विधानसभा जिल्हाप्रमुखपदी ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केलेले ज्येष्ठ शिवसैनिक द्वारकानाथ भोईर यांची नियुकी करण्यात आली आहे.

### पोहण्यापूर्वीच महिलेचा मृत्यू

**नवी मुंबई :** महापालिकेच्या जुहूगाव येथील तरणतलावात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोहण्यासाठी पाण्यात उतरण्यापूर्वीच अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यावरून त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याची शक्यता वर्तवली जात आहे. श्रेया भोईर (वय ४४) असे मृत महिलेचे नाव असून त्या वाशी गाव येथे राहणाऱ्या आहेत. महापालिकेच्या जुहूगाव येथील तरणतलावात त्या पोहण्याच्या प्रशिक्षणासाठी जात होत्या. तरणतलाव दोन महिन्यांपूर्वीच वापरासाठी खुला झाला आहे. त्यात पहिलीच अशी घटना घडली आहे.

# खासगी रुग्णालयातही आरोग्य योजनांचा लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या योजना संयुक्त पद्धतीने इन्शुरन्स व शुरन्स मोडवर एकत्रितपणे राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी यांना प्रतिकुटुंब, पाच लक्ष, प्रतिवर्ष आरोग्य विमा शासनाकडून देण्यात येतो. तसेच योजनेंतर्गत आयुष्यमान कार्ड अथवा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना कार्डधारक हे योजनेमध्ये अंगीकृत असलेल्या शासकिय व खासगी मानांकित रुग्णालयात दाखल झाल्यास त्यांना लाभ घेता येतो.

या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शनाखाली योजनेचा लाभ व्यापक स्तरावर नागरिकांना प्राप्त होण्याकरीता जास्तीत जास्त खाजगी रुग्णालयात हा लाभ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३० रूग्ण खाटांपेक्षा जास्त क्षमता असलेल्या नोंदणीकृत खासगी रुग्णालयांनी या योजनेंतर्गत अंगीकृत असणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत नमुंमपा कार्यक्षेत्रातील अशा मोठ्या क्षमतेच्या ३८ खासगी रुग्णालयांपैकी ११ रुग्णालये अंगीकृत झालेली असल्याने त्याठिकाणी या योजनेची अंमलबजावणी होत आहे तसेच उर्वरित २७ खाजगी रुग्णालये यांनादेखील या योजनेत सहभागी करून घेऊन अंगीकृत करण्याविषयी नमुंमपा मुख्यालयात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नमुंमपा क्षेत्रातील ३० खाटांपेक्षा जास्त क्षमता असलेल्या नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीमध्ये योजनेविषयी जिल्हा समन्वयक यांचेमार्फत अंगीकृत प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली तसेच योजनेत सहभागी होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीमध्ये आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या सर्वसाधारण माणसाला आरोग्यविषयक दिलासा देणाऱ्या योजना असल्याचे स्पष्ट करीत सरकारच्या अपेक्षेनुसार या योजनेसाठी पात्र सर्व रूग्णालयांनी आपल्या रूग्णालयांमध्ये या योजनांची अंमलबजावणी त्वरित सुरू करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता उर्वरित २७ रुग्णालयांनी मार्च २०२५पर्यंत योजना अंगीकृत करण्याची कार्यप्रणाली पूर्ण करण्याचे त्यांनी निर्देशित केले.

याचप्रमाणे आरोग्य विभाग आणि योजनेच्या जिल्हा समन्वयक यांचेमार्फत खासगी रुग्णालय प्रमुखांना याविषयी मार्गदर्शन करण्याच्या व या प्रक्रियेत त्यांना काही अडचणी असतील तर त्याचे निराकरण तत्परतेने करण्याच्याही सूचना देण्यात आल्या.

### पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

या योजननांतर्गत आयुष्यमान कार्ड एमजेपीजेवाय कार्ड तयार करून घेण्याकरिता व्यापक स्तरावर मोहिमेच्या स्वरूपात जनजागृती करावी असे निर्देश देतानाच आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या योजनेंतर्गत पाच लक्ष प्रति कुटुंब प्रतिवर्षासाठी आरोग्य विमा लाभ घेण्याकरिता नागरिकांनी शासनाचे संकेतस्थळ https://setu.pmjay.gov.in/setu/ तसेच https://beneficiary.nha.gov.in या वर पोर्टलवर नोंदणी करावी असे आवाहन केले आहे. तसेच नागरिकांना सरकारच्या या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी नमुंमपा आरोग्य विभागाप्रमाणेच खाजगी रुग्णालयांनीही सतर्क राहण्याच्या स्पष्ट सूचना आयुक्तांनी दिल्या.

# उरणमध्ये पाणथळ दिवस आणि कांदळवन स्वच्छता अभियान



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाचे कांदळवन विभाग-दक्षिण कोकण अलिबाग - रायगड, कांदळवन प्रतिष्ठान, महाराष्ट्र, वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे, उरण व माझी वसुंधरा अभियान ५.०, ग्रामपंचायत बोकडविरा, ग्रुप ग्रामपंचायत नवघर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पाणथळ दिवस व कांदळवन स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले.

कांदळवन वन परिमंडळ अधिकारी किशोर सोनवणे व त्यांचा एमएसएफ स्टाफ, कांदळवन प्रतिष्ठानच्या प्रकल्प सहयोगी साईश्वरी व विवेकजी हे तांत्रिक मार्गदर्शनासाठी तसेच निकेतन ठाकूर हे पर्यावरण प्रकल्प समन्वयक ग्रामपंचायत बोकडविरा व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर उरण संस्थेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख चव्हाण जी डी, डॉ.घोडके राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभागाचे वाय ए गायकवाड व डॉ.सोनवले एम सी, एनएसएसचे डॉ धिंदले, सी डी विद्यार्थी, एमएसएफ स्टाफ व उपस्थित सर्वांनी कांदळवन स्वच्छता अभियान मोहिमेत सहभाग घेतला.

ग्रुप ग्रामपंचायत नवघरचे सरपंच नितीन मढवी, उपसरपंच विश्वास तांडेल, कुंडेगावचे अध्यक्ष प्रमोद पाटील आणि बोकडविरा गावाचे उपसरपंच ध्रुव पाटील व सदस्य मिथुन पाटील यांची विशेष उपस्थिती होती. जमा झालेला कचरा घंटागाडीमार्फत गोळा केले गेला. अशा प्रकारचे स्वच्छता अभियान कांदळवन विभागाद्वारे पुढील काळात आयोजित केले जाणार आहेत.

गावागावात फिरून कांदळवन क्षेत्रांवर कचऱ्याचा नायनाट करणे व कांदळवन परिसंस्थेस असणारा संभाव्य धोका कमी करणे हे ह्या अभियान मागचा उद्देश आहे, असे उपस्थितांनी सांगितले.

# वाकडी व नेरे येथे वन विभाग कार्यालयांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वन विभाग कार्यालय वाकडी व नेरे येथे सोमवारी (दि.१०) आयोजित भूमिपूजन सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत निसर्गाच्या संवर्धनासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले.



या कार्यक्रमाला माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप विभागीय अध्यक्ष नेरे जि. प. सुनील पाटील, युवा मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, वाकडी सरपंच कुंदा बाळू पवार, उपसरपंच प्रभावती खुटले, सदस्य जनार्दन पाटील, गणेश पाटील, केशव वागरे, माजी सरपंच नरेश पाटील, नामदेव जमदाडे, माजी उपसरपंच मंगेश पाटील, नेरे सरपंच प्रकाश गाडगे, निलेश पाटील, उपवनसंरक्षक राहुल पाटील, सहाय्यक वनसंरक्षक सागर पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन पाणपटटे, आदी उपस्थित होते.



**नवी मुंबई : उत्तराखंड समाजाच्या वतीने १६ वर्षांपासूनच्या कौथिग कार्यक्रम होत असतो. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले. कौथिगमध्ये १० दिवस सांस्कृतिक कार्यक्रम होतात. दरवर्षी मी या कार्यक्रमाला उपस्थित राहीन, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. या वेळी भाजप कळंबोली मंडल सरचिटणीस दिलीप बिस्ट व समाजाचे लोक उपस्थित होते.**

# शिरवणेतील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे सलग ४३ वर्षीदेखील अखंड हरिनाम वारकरी-ग्रामस्थ मंडळ, शिरवणे आयोजित हभप सनईकर महाराज, आळंदी देवाची यांच्या मार्गदर्शनाखाली शिरवणे गाव येथील श्री हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमत भागवत कथा मोठ्या धार्मिक वातावरणात झाला.

या हरिनाम सप्ताहात हभप सनकादिक महाराज म्हात्रे, बोनकोडे, हभप ज्ञानराज महाराज म्हात्रे, कोपरखैरणे, हभप द्वारकानाथ महाराज देशमुख, कर्जत, हभप धंदरे महाराज, खेड, हभप आचार्य प्रलाद महाराज शास्त्री, निवलस, हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज बोगीर, नाशिक आणि हभप भगवान महाराज सावंत, जालना यांच्या अमृततुल्य वाणीतून भाविकांनी ज्ञानेश्वरी भाव कथेचा लाभ घेतला तर या वेळी कीर्तनकरांच्या अमृततुल्य वाणीतून सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाचा लाभ भाविकांनी घेतला. यानंतर महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

या वेळी शिरवणे गावातून भव्य दिंडी टाळ मृदूंग आणि लेझीम पथक घेऊन काढण्यात आली. श्री दत्ता बुवा पाटील, ज्ञानदेव बुवा घरत, शांताराम काका भोईर, प्रभाकर नाईक, नामदेव काका भोईर, संजय सुतार आणि भक्तगन यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# खाडीलगत डेब्रिज टाकणाऱ्यावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेत अग्रेसर असणाऱ्या नवी मुंबई शहरात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता टाकल्या जात असलेल्या डेब्रिजमुळे शहर स्वच्छतेला बाधा पोहचत असल्याचे लक्षात घेत या बाबीकडे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार गांभीर्याने लक्ष दिले जात आहे.

या अनुषंगाने परिमंडळ २च्या अतिक्रमणविरोधी डेब्रीज भरारी पथकाने परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली धडक कारवाई करून ऐरोली सेक्टर १० येथील खाडीलगत डेब्रीज टाकताना वाहन पकडले व



ताब्यात घेतले आहे. त्या वाहन मालकाकडून ३० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येत आहे. शहर स्वच्छतेला बाधा पोहचविणाऱ्या घटकांविरोधात यापुढील काळात अधिक धडक कारवाई करण्यात येणार आहे.

# सहकार भारतीमार्फत कायदेशीर मार्गदर्शन सत्र



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सहकार भारती नवी मुंबईच्या वतीने मेरिडियन सहकारी गृहनिर्माण संस्था सेक्टर ६ या ठिकाणी कायदेशीर वारस दाखला, विल व प्रोबेत मार्गदर्शन सत्राचे आयोजन सहकार भारती मार्फत करण्यात आले होते.

सरकार भारतीय अध्यक्ष प्रमोद जोशी, महामंत्री संतोष मिसाळ, अधिवक्ता प्रकोष्टप्रमुख अ‍ॅड. साक्षी वेखंडे, मार्गदर्शक अ‍ॅड. सुशांत जोशी, अ‍ॅड. अपर्णा नाडगोडी (कुलकर्णी), अ‍ॅड. पांडुरंग नाईक, अ‍ॅड. प्रितेश जोशी, उदय कुमार तांदळे, सुनील सावंत, डावरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

गृहनिर्माण संस्थांमध्ये सर्वांना भेडसावणाऱ्या प्रॉबेट, वील, हेयरशिप या समस्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शन करत असताना कायदेशीर तरतुदी त्या करत असताना घ्यावी लागणारी काळजी त्यातील धोके आणि फायदे या सर्वांचे सविस्तरमाहिती मार्गदर्शकांनी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना दिली. गृहनिर्माण संस्थामधील सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

सर्व सभासदांच्या शंकांचे समाधान केल्यानंतर गृहनिर्माण संस्थांचे अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन आणि कार्यक्रमाचे सांगता झाली. त्याचप्रमाणे भविष्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या आयोजन करावे व गृहनिर्माण संस्थेला मदत करावी अशी विनंती केली. या कार्यक्रमाच्या आयोजनसाठी रोहित गुप्ता यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

# शिक्षण उपसंचालकांची नवी मुंबईतील परीक्षा केंद्रांना भेट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इयत्ता पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा रविवारी (दि. ९) घेण्यात आली. या परीक्षेसाठी राज्यातून नऊ लाख ४४ हजार ४३४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून सहा हजार ४४९ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली



राज्यातील सर्व जिल्ह्यात एकाच दिवशी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येणार आहे. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पाच लाख ६६ हजार ३५३, तर आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी तीन लाख ७८ हजार ८१ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. परीक्षेसाठी एकूण ७६ हजार मनुष्यबळाची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. परीक्षेतील पेपर १ हा सकाळी ११ ते दुपारी १२.३०, तर पेपर २ हा दुपारी २ ते ३.३० या वेळेत होणार आहे.

या परीक्षेसाठी नवी मुंबई शहरात एकूण परीक्षा केंद्रे सुसज्ज आहेत. पाचवीची १६ केंद्रे व आठवीची एकूण केंद्रे नेमून दिली आहेत. सर्व नवी मुंबई महापालिकेच्या क्षेत्रात पाचवीचे ३४८१ व आठवी २४३५ एकूण ५९१६ विद्यार्थी उपस्थित होते.

परीक्षा केंद्रांना शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांनी नवी मुंबई येथील आयएएस, नवी मुंबई प्राथमिक व माध्यमिक शाळा या केंद्रांना भेट दिली. केंद्र संचालक पालवे सर, माध्यमिक केंद्र संचालिका चारूलता कोलते, मनोज महाजन केंद्र सहायक तसेच महापालिकेच्या अधिकारी सुलभा बारगडे आदी उपस्थित होते.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : समुद्रकिनारी शासनाकडून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरू आहे. त्यामुळे किनारे सुरक्षित होतील यात वाद नाही, परंतु या बंधाऱ्यांना सुशोभीकरणाचे रूप दिले तर त्याचा पर्यटनासाठी फायदा होऊ शकतो, अशी मागणी स्थानिक करीत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

# नवी मुंबईत रंगला पतंग महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई फेस्ट ग्लोबल फाउंडेशनच्या पतंग महोत्सव २०२५ ने नवी मुंबईतील नागरिकांना एकत्र आणत आनंद, कला, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा अनोखा संगम घडवला. रविवारी (दि.९) फोर पॉईंट्स बाय शेरेटन, वाशी येथे रंगलेल्या या भव्य सोहळ्यात रंगबेरंगी पतंगांनी आकाश सजले, तर विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.



या विशेष सोहळ्याला उत्तराखंड राज्याचे माजी वन व कृषिमंत्री हरक सिंग रावत आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी उपस्थित राहून या संकल्पनेचे कौतुक केले आणि स्वतः पतंग उडवून या अनोख्या महोत्सवाचा आनंद लुटला. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोनक अ‍ॅडव्हर्टायझिंगचे अमरदीप सिंग आणि आर. के. महापात्रा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांना परवेज खान, परेश त्रिवेदी, प्रवीण ठाकूर, हरमीत सिंग, उमेश चौधरी, अशोक मेहरा, डॉ. संजीव कुमार आणि इतर मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी संगीतमय कार्यक्रम, विविध राज्यातील कलाकारांची सादरीकरणे आणि पारंपरिक तसेच आधुनिक खाद्यसंस्कृतीचे स्टॉल्स सजवण्यात आले होते. फाऊंडेशनने या सोहळ्यातून नवोदित आणि स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ज्यामुळे नवी मुंबईचा सांस्कृतिक वारसा जपत नवी ओळख मिळेल, असे या वेळी आयोजकांनी सांगितले.

या यशस्वी सोहळ्यानंतर फाऊंडेशन भविष्यात अधिक भव्य आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यास सज्ज आहे. नवी मुंबईच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीला चालना देण्यासाठी फाउंडेशन महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. पतंग महोत्सव हा केवळ एक उत्सव नव्हता, तर सामाजिक एकतेचा एक ऐतिहासिक क्षण ठरला.

# जोरदार वाऱ्यामुळे मासेमारी ठप्प

## मच्छीमारांच्या नौका समुद्र किनारी उभ्या

**मुरूड : प्रतिनिधी**

सद्या खोल समुद्रात वाऱ्याचा वेग वाढला आहे. त्यामुळे या वाऱ्याचा वेगामुळे मासेमारी ठप्प झाली असून, किमान ६० टक्के नौका नांगर टाकून उभ्या आहेत. त्यामुळे मुरूड तालुक्यातील राजपूरी, एकदरा, आगरदांडा, बोर्ली, रेवदंडा, साळाव, कोर्लाई आदी भागातील होड्या किनाऱ्याला लागल्या आहेत.



खोल समुद्रात जाऊन मुबलक मासळी मिळत नाही त्यामुळे बोट मालकाचा खरच सुधा निघत नाही. मासळी मुबलक न मिळाल्यामुळे मासळी मार्केट मध्ये मासळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मुरूड तालुक्यातील विविध बंदरात गेले महिनाभर मत्स्यदुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे मच्छीमारांची अवस्था बिकट झाली असून मची मारांवर कर्जाचे प्रमाण वाढले आहे.

मागील काही दिवसांपासून अचानक किनारपट्टीला उत्तरेकडील जोरदार वारे वाहू लागले आहेत. त्यामुळे गेली चार ते पाच दिवस थंडीचे प्रमाणसुद्धा वाढले आहे. जोरदार वारे वाहण्यामुळे उपलब्ध मासळी खोल भगात निघून गेली गेली आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व समुद्र किनाऱ्याला या जोरदार वाऱ्यांचा परिणाम सहन करावा लागत आहे. मासळीची आवक कमी झाल्याने मासळी मार्केटमध्ये मासळीचे दर कमालीचे वाढले आहेत. माध्यम आकाराची सुरमय अथवा रावस यासाठी किमान दोन हजार रुपये आकारले जात आहेत.

उत्तरेकडील वाऱ्यामुळे खोल समुद्रात पाण्यामध्ये मासेमारी करणे शक्य होत नाही. मासेमारी करीत टाकलेली जाळीदेखील गुरफटली आहेत आणि आता ती मच्छीमारांना सोडवायला लागत आहेत. यामध्ये जाळ्यांचे नुकसान होत आहे. म्हणूनच अशा जोरदार वाऱ्यामुळे मच्छीमार समुद्रात मासेमारीला जात नाहीत. मासळीचे दर वाढल्याने सर्व हॉटेल मध्ये आता मासळी थाळीचा दर ४५० रुपयापेक्षा जास्त झाला आहे.

उत्तरेच्या वाऱ्यामुळे बोटीच किनाऱ्यावर आणाव्या लागल्यामुळे उलाढाल थंडावली आहे. हंगाम सुरू झाल्यापासून तशी मासळीची आवकच घटली आहे आणि त्यात असे प्रसंग आले की मच्छीमार यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे.आठ आठ दिवस खोल समुद्रात राहून मुबलक मासळी मिळाली नाही तर काम करणाऱ्या लोकांचे पैसे कसे द्यावयाचे हा मोठा प्रश्न निर्माण होतो. परिणामी बोट मालकावर कर्ज वाढत आहे.

**मागील एक महिन्यापासून उत्तरेकडील जोरदार वाऱ्यामुळे मासळी खोल भागात निघून गेली आहे. अचानकपणे वातावरणातील या बदलामुळे मासळीवर याचा गंभीर परिणाम होऊन मच्छीमारांचे मोठे नुकसान होत आहे. लवकरच हवामानात बदल घडून येईल, कारण आता थंडीचे प्रमाणसुद्धा ओसरले आहे. हवामानात बदल घडून येऊन पुन्हा मासेमारी जोरदार सुरू होईल.**
**–मनोहर बैले, उपाध्यक्ष,**
**रायगड जिल्हा मच्छिमार संघ**

# 'माझी वसुंधरा' अंतर्गत वासांबेमध्ये विद्यार्थ्यांची पथनाट्याद्वारे जनजागृती

## प्लास्टिकबंदीबाबत रॅलीही उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पृथ्वीवरील प्रत्येक जीवाला वसुंधरेची गरज आहे, सर्वच बाबतीत दूषित होणारे निसर्गाचे परिणाम भविष्यात खूपच घातक ठरणारे आहेत, म्हणुन माझी वसुंधरा ५.० या साठी सर्वांनी मनापासून काम करावे, असे आवाहन वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा संदीप मुंढे यांनी रविवारी (दि.९) दुपारी मोहोपाडा मुख्य बाजारपेठेत केले.



ग्रुप ग्रामपंचायत वासांबेमध्ये माझी वसुंधरा ५.० अंतर्गत जनजागृतीचे काम मोठ्या उत्साहात चालु आहे. रविवारच्या बाजारात जास्तीत जास्त जनजागृती व्हावी यासाठी रा.जि.प.शाळा शिवनगर व रा.जि.प.शाळा रीसच्या विद्यार्थ्यांकडून पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. शिवनगरच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी निसर्गातील पंचमहाभुतातील तत्वांचे महत्त्व व संवर्धन याबाबत जनजागृती केली, तर रिस शाळेतील विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक बंदी या विषयावर पथनाट्य सादर केले.

यानंतर मोहोपाडा रविवारच्या आठवडा बाजारातून प्लास्टिक मुक्ती वर जनजागृती रॅली काढली. कार्यक्रमात वासांबे ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, सदस्या रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत, प्रशाली खाने, ताई पुंडलिक पवार आदीसह स्वच्छता कमिटीचे सदस्य विवेक ओक व इतर ग्रामपंचायत कर्मचारी स्थानिक नागरीक उपस्थित होते. सदर कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापिका तथा माझी वसुंधरा समन्वयक रजनी विनायक गायकवाड यांनी नियोजन केले.

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी विविध पर्यावरण पूरक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली एकआहे. त्यामुळे आदिवाशी दुर्गम भागातील आदिवासी भागात विकास उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे. पंच महाभुते आधारित पर्यावरण संतुलन टिकविण्यासाठी काम करताना वेगळी ऊर्जा मिळते, असे ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे यांनी सांगितले.

# जिंदल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील महाराष्ट्र सिमलेस लि.कंपनीची सुकेळी येथील जिंदल माउंट लिटेरा झी स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले.



या वेळी जिंदल स्कूल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरिक प्रगतीसाठी कटीबद्ध असल्याचा विश्वास महाराष्ट्र सिमलेस लि.कंपनीचे डायरेक्टर शिवकुमार सिंघल यांनी उपस्थित पालकवर्ग व ग्रामस्थांना दिला. स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून दहावी व बारावीच्या गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी विध्यार्थ्यांनी दाखविलेल्या कला गुणांना प्रेषकांनी भरभरून दाद दिली.

या वार्षिक स्नेहसंमेलनाला शिवकुमार सिंघल यांच्या समवेत रोहा गट विकास अधिकारी शुभदा पाटील, कंपनीचे सुकेळी प्रोजेक्टचे अध्यक्ष मुकेश दुबे, उपाध्यक्ष आर. के. खंडेलवाल, उपाध्यक्ष संजीव बॅनर्जी, वरिष्ठ जनरल मॅनेजर एस.के. यादव, डेप्युटी जनरल मॅनेजर के.के. पांडे, स्कूलच्या मुख्याध्यापिका लिली रॉय, उपमुख्याध्यापिका स्वागतिका साहू, स्कुलचे मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाशंकर सिंग, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी संदिप पाटील, ऐनघर सरपंच कलावती राजेंद्र कोकळे, ज्येष्ठ सदस्य मनोहरभाई सुटे, उपसरपंच भगवान शिद, किशोर नावले, विनोद निरगुडे, सविता जितेंद्र धामणसे, नकीबाई काशिनाथ कोकळे, सुषमा नामदेव वाघमारे, प्रज्वली भरत भोईर, अर्चना सचिन भोसले, पल्लवी हेमंत भोईर, वैदेही विठ्ठल इंदुलकर, सुवर्णा यशवंत शिद, कल्याणी नरेंद्र मोहिते आदी मान्यवरांसह शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी पालकवर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

# हाशिवरे हितवर्धक मंडळाचा वर्धापन दिन

**अलिबाग : प्रतिनिधी**

हाशिवरे हितवर्धक मंडळ, हाशिवरे संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हाशिवरे, वैजाळी इंग्रजी माध्यम शाळा व वैजाळी मराठी माध्यम प्राथमिक शाळा, हाशिवरे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथे उत्साहात ७७ वा वर्धापन दिन साजरा झाला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शैलेश मोकल संस्था खजिनदार यांनी केले. संस्थेच्या उपाध्यक्षा सरोज डाकी यांनी अध्यक्षस्थान भूषवले तर प्रमुख पाहुणे सदाशिव गणपत पाटील सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालमोहन विद्यामंदिर मुंबई लाभले. त्याचबरोबर त्यांनी प्रेरक भाषणाद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध करून सोडले. सजीव, निर्जीव सर्वसृष्टीचे चराचर निरीक्षण करून भाषणाची सुरुवात केली ७७ व्या रौप्य वर्षानंतरच्या वर्धापनास एका शिक्षकास पाहुणा म्हणून सन्मान दिल्याबद्दल आभार मानले.

स्वर्गीय आनंद देणारी वास्तू अशी उपमा संस्थेस दिली. त्यांचे स्पंदन चारोळी, ५० गाणी, ३५० कविता, लेखन प्रसिद्ध आहेत. आत्मपरीक्षणाने खचून न जाता, ज्ञानाचे पंख वापरा उंच उंच उडा अशी शिकवण दिली. आई वडील, विद्यामंदिर ,शिक्षक, समाज यांच्या विचारांचा आदर्श घ्या आणि कवितेतून भाषणाची सांगता केली. आम्ही प्रकाश वाटा उजळीत चाललो, आम्ही कळ्यांना फुलवित चाललो, आम्ही कोरड्या वाटा भिजवीत चाललो, आम्ही बिया बियांना रुजवित चाललो विद्यार्थ्यांच्या मनाच्या हिंदोळ्यावर नाचता आले पाहिजे असे सांगून सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमास संस्थेच्या उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्षा सरोज डाकी, संस्थेचे सचिव ज्ञानेश्वर मोकल, सचिव अनिल मोकल, सल्लागार सुबोध मोकल, सदस्य निशिकांत मोकल, आदिनाथ पाटील, मिलिंद मोकल, सदस्य रमण पाटील, सीईओ माजी कडवे सर, एम एन पाटील, सागर पाटील आगरी पीएचडी धारक, स्नेहा पाटील, वर्तक मॅडम उपस्थित होते तसेच सर्व गुरूंना नमन करून संस्था सचिव अनिल मोकल यांनी पाचवी अ ब ने लिहिलेले पत्र वाचले व कौतुक केले. गुणवंत शिक्षक व कर्मचारी यांचा सत्कार झाला.

मुख्याध्यापक गायकवाड व पर्यवेक्षक प्रबळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिन साजरा झाला संकुलातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पाहुणे, पदाधिकारी यांचे आभार शिकारे सर यांनी मानले व वर्षा नाईक यांनी सूत्रसंचालन केले.

# वेदा जनजागृती मंचतर्फे विविध कार्यक्रम उत्साहात

**महाड : प्रतिनिधी**

गेली काही वर्ष जनजागृती करण्याच्या हेतूने वेदा जनजागृती मंच या संस्थेच्या माध्यमातून मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. रविवारी पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती अशी जनजागृती करत मॅरेथॉन काढण्यात आली. या मॅरेथॉन बरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सत्कारदेखील करण्यात आला.



वेदा जनजागृती मंच या मंचातर्फे सकाळी झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेचे पारितोषिक वितरण व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम महाड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे रविवारी (दि.९) आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम. एम. ए. सी इ टी पी चे अध्यक्ष अशोक तलाठी, बालरोग तज्ञ डॉ.चंद्रशेखर दाभाडकर, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रभाकर भुस्कुटे गुरुजी, हायकल कंपनीचे व्यवस्थापक सतीश कवळे, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, वेदा जनजागृती मंचाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिगंबर गीते आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉक्टर गीते यांनी संस्थेच्या कार्यालयाबद्दल माहिती देवून संस्था यापुढे देखील असेच सामाजिक उपक्रम राबवत राहील असे स्पष्ट केले. यावेळी बोलताना प्रभाकर भुस्कुटे, डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, अशोक तलाठी, निलेश पवार यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव केला. यावेळी विविध क्षेत्रात लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील डॉ.सचिन आणि सौ. संध्या बुटाला, डॉ. आदेश पाथरे, डॉ. राहुल सुकाळे, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षिका नम्रता निलेश पवार, सौ. केतकी कृष्णा पवार व शिक्षक वसंत साळुंखे, पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे जेष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे, युवा पत्रकार राजेश भुवड, पत्रकार निलेश लोखंडे, कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या शिवलंका कृषी उत्पादक संघटनेचे सोनावले, व्यापार क्षेत्रात काम करणारे युवा उद्योजक तुषारशेठ यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका पवार मॅडम व बडे सर यांनी केले तर आभार संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर दिगंबर गीते यांनी केले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.दिगंबर गीते यांच्या मार्गदर्शनाखाली वेदा जनजागृती मंचाचे सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

# अग्रवाल विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील को.ए.सो. गु. रा. अग्रवाल विद्यामंदिरातील सोमवारी (दि.१०) इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विद्यालयाच्या प्राचार्या आर.आर.ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश जेडगे होते. या कार्यक्रमास नेताजी गायकवाड, सकाळ सत्र स्टाफ सेक्रेटरी कैलास गाडे व दुपार सत्र स्टाफ सेक्रेटरी अनिल तिरमले उपस्थित होते. त्याचप्रमाणे शिक्षक प्रतिनिधी अबेसिंघ गावित, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष गोळे तसेच सर्व शिक्षक वृंद आणि दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्राध्यापक सुनील देवरे यांनी गणेश स्तवन पर गीत सादर केले. त्यानंतर उपस्थित शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील भावी शिक्षणासाठी आणि दहावी बोर्ड परीक्षेस शुभेच्छा दिल्या.तसेच विद्यार्थ्यांनी आपापल्या मनोगतातून शाळा व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्नेह नाष्टा व परीक्षेसाठी उपयुक्त साहित्य (पट्टी) वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोल्हटकर तर आभार भाविका सुतार यांनी मानले.

# मुरूड तालुक्यातील साळाव बिर्ला गणेश मंदिर पर्यटकांचे आकर्षण

रायगड जिल्हा हा ठाणे, पुणे, मुंबई व रत्नागिरी जिल्हांना जवळचा जिल्हा आहे. अशा या जिल्हातील मोजक्याच तालुक्यांना समुद्रकिनारा लाभला आहे. त्यातील मुरूड-जंजीरा तालुका म्हणजे प्रति गोवा मानले गेले असल्याने एक दिवसांचे पर्यटनस्थळ म्हणून पर्यटकांचे खास आकर्षण आहे. काही वर्षापुर्वी मुरूड तालुक्यात साळाव येथे बिर्ला उद्योग समुहाने विक्रम वसाहत प्रकल्प यांच्या मधील छोट्याश्या टेकडीवर उभारलेले विक्रम विनायक मंदिर बांधले. हे मंदिर अल्पावधीत भक्ताचे श्रध्दास्थान व पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्दीस आले आहे.



रोहा-रेवदंडा कुंडलिका खाडीलगत व रेवदंडा-रोहा मुख्य रस्तावरील साळाव या गावानजीक छोट्याश्या टेकडीवर बिर्ला समुहाने हे विक्रम विनायक मंदिर पंरपरेने बांधले आहे. मंदिर राजस्थान व गुजरात येथील संगमवरी दगडातून उभारलेले आहे. मुंबईच्या शापुरजी मालनजी बिल्डर्सनी भव्य व दिव्य असे बांधकाम केले आहे.

टेकडीवर मंदिराकडे जाण्याकरीता पायऱ्या व मोटर रस्ता असे दोन मार्ग आहेत. टेकडीच्या पायथ्याशी दोन सुंदर सिंह शिल्पे आहेत. मंदिराचे बांधकाम दोन सभा मंडप व गर्भगृह अशा प्रकारचे असून सभा मंडपाचे छत संपुर्णपणे पारदर्शक असून चारी बाजूना सभामंडप खुला आहे. मुख्य गाभाऱ्यास श्री विनायकांची भव्य संगमवरी मुर्ती आहे मुर्तीसोबत शंकर-पार्वती, दुर्गा माता , रिध्दीसिध्दी, राधाकृष्ण व सुर्यदेवाचीही मुती आहे. सर्व मुर्ती जयपुरहून आणलेल्या कसबी कारागिरांनी घडविल्या असून आकाशात उंच सुळक्यासारख्या जाणाऱ्या शुभ्र संगमवरी कळसामुळे मंदिराची शोभा विशेषत्वाने वृध्दीगंत झालेली आहे.

वृंदावन येथील पुजारी मंदिर म्हटले की पूजा अर्चा करण्याचा मुद्दा आलाच या मंदिरासाठी वृदावंन येथून खास दोन पुजारी आणले आहेत. सकाळी सहा ते साडेअकरा व सायंकाळी साडेचार ते नऊ या वेळात भक्तांना मंदिरात प्रवेश दिला जातो. मंदिरात परिसरात रमणीय बाग आहे बागेत सायंकाळी अविस्मरणीय विद्युत रोषणाई पहावयास मिळते. मुळातच निसर्गरम्य असलेल्या या परिसरात शोभा वाढविणारे हे मंदिर निर्सगाशी एकरूप झालेले दिसते. बागेमध्ये स्व. आदित्य बिर्ला यांचा पुतळा आहे. बागेत कांरजे असून तेही विद्युत रोषणाईत अधिकच प्रेक्षणिय झाले आहे.

मुंबई-पुणे-रत्नागिरी अशा अनेक शहरातून भाविक व पर्यटक येथे येत असतात विशेषतः संकष्टी चतुर्थीसारख्या धामिक महत्वाच्या दिवसांव्यक्तीरिक्त रविवारी व अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यटकांसह भाविकांचे मोठे लोंढे येतात. विशेष म्हणजे सर्वधर्मिय नागरिक दर्शन घेतात. मंदिरामुळे स्थानिकांना व्यवसाय निर्माण झाला आहे. या परिसरात दिवसभर पुण्याच्या सारसबागेसारखे स्वरूप प्राप्त झाले आहे. येथील ऑटोरिक्षा, सितारा व्हॅन, यांनाही पर्यटकांमुळे उद्योगधंदा मिळाला आहे. मंदिराच्या समोरील भागात रसवंती गृह, खाद्य पदार्थाचे विविध स्टॉल, छोटी उपाहार गृहे, नारळ व फुलांच्या हातगाड्या, चणे, फुटाणेवाले, ते स्थानिक परिसरातील भाजी विक्रेते व फळ विक्रेते या सर्वाना व्यवसाय निर्माण झाला आहे. प्रकल्पाने मंदिराचा समोरील भागात खाजगी बस वाहनासाठी वाहनतळ उभारला आहे मात्र वाहनाची आवक पहाता तो आता अपुरा पडत आहे. पर्यायाने वाहने रस्तावर उभी करावी लागत असल्याने ट्रफिक समस्या निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अलिबाग आगाराच्या दिवसभरात तुरळक बसफेऱ्या धावतात, पेण आगाराचे शनिवारी व रविवारी ठेवलेली बसफेरी रद्द केली आहे. पर्यटकांनी मुरूड,पेण, रोहा, महाड, कर्जत, श्रीवर्धन, बस आगारातून बिर्ला विनायक मंदिराकडे पर्यटन बससेवा सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मंदिराच्या प्रवेशव्दाराजवळ दोन ते चार सुरक्षा अधिकारी ठेवण्यात आले असून त्या ठिकाणी भक्तमंडळीच्या सामानाची तपासणी होते. सामान ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली असून परवनागी शिवाय कोणालाही छायाचित्र काढता येत नाही विशेष कयन मासिक, साप्ताहिके, दैनिक अशा प्रसिध्दी माध्यमातून काम करणाऱ्यांना छायाचित्र काढण्यास परवानगी आहे, मात्र तशा प्रकारचा सुरक्षा अधिकारी वर्गाकडे संपर्क साधावा लागतो असे हे बिर्ला मंदिर एक दिवसीस पर्यटनक्षेत्र बनलेले व भाविकांचे श्रध्दास्थान आर्थिक व वेळेच्या दृष्टीचे सोयीचे स्थळ आहे. प्रत्यक्ष भेट दिल्यावर निसर्गाच्या आस्वादाचा पर्यटक बनल्याचा मना आनंद नक्कीच मिळतो.

**–महेंद्र खैरे, रेवदंडा**

# हिटमॅन इज बॅक! रोहित शर्माच्या शतकी खेळीने विक्रमांची रांग




**कटक : वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या झंझावाती शतकाच्या जोरावर भारताने दुसऱ्या वनडे सामन्यात इंग्लंड संघाचा चार विकेट्सने पराभव केला, या पराभवासह भारताने तीन सामन्यांची वनडे मालिका २-० अशा अभेद्य आघाडीसह आपल्या नावे केली आहे. या एकाच शतकात त्याने अनेक विक्रम मोडीत काढत इतिहास रचलाय.

रोहित शर्माला मोठ्या प्रतिक्षेनंतर सूर गवसला आणि त्याने चौकार-षटकारांच्या आतिषबाजीसह आपले ३२वे वनडे शतक झळकावले. रोहितने ९० चेंडूत १३२च्या स्ट्राईक रेटने सात षटकार आणि १२ चौकारांसह ११९ धावांची विक्रमी खेळी खेळली. या खेळीने रोहितने केवळ भारतीय संघाला विजयापर्यंत नेले नाही, तर अनेक दिग्गजांनाही मागे टाकले.

**कर्णधार म्हणून ५०व्या आंतरराष्ट्रीय वनडे सामन्यात सर्वोत्कृष्ट धावसंख्या**

रोहित शर्माचा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून ५०वा आंतरराष्ट्रीय सामना होता. या सामन्यात त्याने शतक झळकावत मोठी कामगिरी केली आहे. कर्णधार म्हणून ५०व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात ११९ धावांची सर्वात मोठी खेळी करीत रोहितने पहिले स्थान पटकावले आहे. याआधी श्रीलंकेच्या सनथ जयसूर्या याने कर्णधार म्हणून खेळताना २००१मध्ये न्यूझीलंडविरुद्ध ५०व्या आंतरराष्ट्रीय वनडे सामन्यात १०७ धावा केल्या होत्या.

**सचिन तेंडुलकरचे दोन विक्रम मोडले**

कटक वनडेमध्ये रोहित शर्माने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील ३२वे शतक झळकावले. हे त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ४९वे शतक ठरले. यासह त्याने सचिनचा विक्रम मोडला आहे. खरंतर रोहित वयाच्या ३० वर्षांनंतर सर्वाधिक शतक्श झळकावणारा भारतीय फलंदाज बनला आहे. याआधी सचिनच्या नावावर ३५ शतकांचा विक्रम होता. आता भारतीय कर्णधाराने ३६ शतके ठोकली असून या बाबतीत त्याने ऑस्ट्रेलियन दिग्गज रिकी पाँटिंग आणि मॅथ्यू हेडन यांची बरोबरी केली आहे. भारतीय सलामीवीर म्हणून सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत त्याने सचिनला मागे टाकले आहे. सलामीवीर रोहितने ३६८ डावात १५४०४ धावा केल्या आहेत, तर सचिनने १५३३५ धावा केल्या होत्या.

**राहुल द्रविडला टाकले मागे**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत त्याने अनुभवी भारतीय क्रिकेटपटू राहुल द्रविडला मागे टाकले. द्रविडने आपल्या कारकिर्दीत ४८शतकं झळकावली होती. जर आपण सक्रिय खेळाडूंबद्दल बोललो तर आता तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. रोहितने ५२६ डावांमध्ये ४९ शतके ठोकली आहेत, तर स्मिथने ४१० डावांमध्ये ४८ शतके केली आहेत. विराट कोहली ८१ शतकांसह पहिल्या, तर जो रूट ५२ शतकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. याशिवाय रोहितने आता एकदिवसीय क्रिकेटमध्ये ११९ धावांच्या खेळीसह १०९८७ धावा केल्या आहेत आणि राहुल द्रविडला मागे टाकले आहे. द्रविडच्या नावे वनडेमध्ये १०८८९ धावा होत्या.

**लॉईड, पाँटिंग, कोहलीची बरोबरी**

कटकमधील वनडे जिंकून रोहितने एका मोठ्या विक्रमाची बरोबरी केली. त्याने ५० एकदिवसीय सामन्यांनंतर सर्वाधिक सामने जिंकणाऱ्या कर्णधारांच्या यादीत क्लाइव्ह लॉईड, रिकी पाँटिंग आणि विराट कोहली यांची बरोबरी केली आहे. तिघांनी सर्वाधिक प्रत्येकी ३९ सामने जिंकले होते. रोहितने कर्णधार म्हणून ५० वनडेमध्ये ३९ सामने जिंकले आहेत.

### ख्रिस गेलचा विक्रम मोडत नवा रेकॉर्ड

रोहितने आपल्या शतकी खेळीत सात षटकार लगावले. यासह आता वनडेत रोहितच्या नावे ३३८ षटकार नोंदवले आहेत. याबाबतीत त्याने वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल याचा षटकारांचा विक्रम मोडला आहे. आता रोहित एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. रोहितने २५९ डावात ही कामगिरी केली आहे. या बाबतीत पाकिस्तानचा माजी खेळाडू शाहिद आफ्रिदी सध्या पहिल्या स्थानावर आहे. त्याने ३६९ डावात ३५१ षटकार लगावले आहेत.



# भिंगारी संघ नमो क्रिकेट चषकाचा मानकरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नमो चषक २०२५ अंतर्गत खारघर येथे झालेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत भिंगारी संघाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या संघाला एक लाख ११ हजार १११ रुपये व भव्य चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत उपविजेता वहाळ संघ, तर तृतीय क्रमांक वळवली संघाने मिळवला. मालिकावीर वळवलीचा सुयोग म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज वहाळचा प्रयास कोळी, उत्कृष्ट गोलंदाज घनश्याम पाटील, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक भिंगारीचा सूरज परदेशी ठरला.

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषकचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत खारघर सेक्टर १४ येथील जय हनुमान चेरोबा बापदेव मैदानावर प्रवीण स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनच्या संयोजनाखाली भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा दिवस-रात्र स्वरूपात खेळविण्यात आली.

या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर तसेच रामकुमार चौधरी, किरण पाटील, प्रवीण बेरा, सुरेश ठाकूर, शुभ पाटील आदी उपस्थित होते.

या स्पर्धेतील उपविजेत्या संघाला ५५ हजार ५५५ रुपये, तृतीय क्रमांकाच्या संघास ३३ हजार ३३३ रुपये तसेच मॅन ऑफ दि सिरीजला मोटरसायकल अशा भरघोस पारितोषिकांसोबतच दररोज प्रेक्षकांसाठी काढण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये एकूण चार सायकल बक्षीस देण्यात आल्या.

या स्पर्धेत कानपोली, दापोली, मुर्बी, पेठ, बामणडोंगरी, कुंडेवहाळ, कामोठे, ओवळे, बापदेव पोदी, भैरवनाथ विचुंबे, स्व. महादेव पेठाली, अथर्व इलेव्हन घोट, गावदेवी भाताणपाडा, हिमांशू वळवली, मंगलमूर्ती घरकुल, जय हनुमान नावडे, यंगस्टार वहाळ, जिवा इलेव्हन पेंधर, धाकटा खांदा, शनिकृपा कोपरा, शिवशक्ती खारघर, श्रीराम शिरढोण, उलवा व ओम साई भंगारपाडा या नामवंत २४ संघांचा सहभाग होता.

# देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ५० 'लाडक्या पैलवान बहिणीं'च्या कुस्त्या

**जळगाव : प्रतिनिधी**

जळगावच्या जामनेर तालुक्यात येत्या १६ फेब्रुवारीला 'शरीर तंदुरुस्त, खेळच सर्वोत्तम' हा संदेश देत नमो कुस्ती महाकुंभ-२मध्ये देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने महिला कुस्तीलाही समान सन्मान दिला जाणार आहे. मंत्री गिरीष महाजन यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणचा नारा देत ५० लाडक्या 'पैलवान' बहिणींच्या कुस्त्याही रंगणार आहेत. एवढेच नव्हे प्रारंभ आणि समारोप महिला कुस्तीने केला जाणार आहे.

भव्य स्पर्धेत भारतातील नामांकित महिला कुस्तीपटू परदेशी मल्लांविरुद्ध आपली ताकद आजमावणार आहेत. कुस्तीच्या इतिहासात महिला कुस्तीपटूंना असा सन्मान प्रथमच दिला जात असल्याची स्फूर्तिदायक माहिती संयोजक समितीचे प्रमुख हिंदकेसरी रोहित पाटील यांनी दिली.



२२ प्रमुख लढतीसोबत स्थानिक ३०० महिला आणि पुरुष पैलवानांच्याही जोरदार कुस्त्या पहायला मिळणार आहे.

स्पर्धेत सहभागी खेळाडूंवर बक्षिसांचा अक्षरशः वर्षाव होणार असून विजेत्यांना रोख पारितोषिकांसह मानाची गदा आणि 'देवाभाऊ केसरी' हा प्रतिष्ठेचा किताब प्रदान केला जाणार आहे.

स्पर्धा १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सुरू होऊन संध्याकाळी ८ वाजेपर्यंत चालणार आहे. क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

### प्रथमच नऊ देशांच्या मल्लांचा महामुकाबला!

या महामुकाबल्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे भारताच्या कुस्ती इतिहासात प्रथमच तब्बल नऊ देशांचे नामवंत महिला आणि पुरुष मल्ल एकाच मंचावर भिडणार आहेत. भारत, फ्रान्स, मोल्दोवा, उझबेकिस्तान, रोमानिया, एस्टोनिया, इराण, ब्राझील आणि जॉर्जिया या देशाचे ऑलिंपियन, जागतिक विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, हिंद केसरी, रुस्तम-ए-हिंद, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी आणि उपमहाराष्ट्र केसरी असे नामांकित पैलवान सहभागी होणार आहेत.

# चॅम्पियन्स ट्रॉफीतून आणखी एक खेळाडू 'आऊट'

## इंग्लंडचा जेकब बेथेल दुखापतग्रस्त



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या भारत-इंग्लंड वनडे मालिका सुरू असून भारताने दोनपैकी दोन्ही सामने जिंकत मालिकेत २-० ची आघाडी घेतली. आता १९ फेब्रुवारीपासून चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा सुरू होणार आहे आणि त्यापूर्वी अनेक खेळाडू दुखापतीमुळे बाहेर पडले आहेत. आता जखमी खेळाडूंच्या यादीत आणखी एक नाव जोडले गेले आहे.

इंग्लंडचा डावखुरा फलंदाज जेकब बेथेल याला दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर जावे लागले आहे. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने याची पुष्टी केली तसेच बेथेलच्या जागी पर्यायी खेळाडू म्हणून टॉम बॅन्टन याला भारतात बोलावून घेण्यात आले आहे.

सर्व संघ जाहीर झाल्यानंतर आतापर्यंत चॅम्पियन्स ट्रॉफीमधून एकूण सात मोठे खेळाडू बाहेर पडले आहेत. पाकिस्तानचा सॅम अयुब दुखापतीमुळे स्पर्धेत खेळू शकणार नाही. दक्षिण आफ्रिकेचे वेगवान गोलंदाज ऑनरिक नॉर्खिया आणि गेराल्ड कोइत्झे हेही स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. याशिवाय ऑस्ट्रेलियाचे जोश हेझलवूड आणि कर्णधार पॅट कमिन्स चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणार नाहीत, तर मार्कस स्टोइनिसनेही अचानक निवृत्ती घेतली आहे.

# नमो चषक फुटबॉल स्पर्धेत एसएसएफए बी संघ सरस







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नमो चषक क्रीडा महोत्सव अंतर्गत फुटबॉल स्पर्धा झाली. या स्पर्धेत एसएसएफए बी संघाचे विजेतेपद पटकाविले.

कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेला लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक विजय चिपळेकर व माजी नगरसेविका हेमलता गोवारी यांच्या हस्ते झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक अजय बहिरा, भाऊ भगत, रवी गोवारी, महिला मोर्चाच्या कामोठे अध्यक्ष वनिता पाटील, भाजपचे शहर सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, मनोहर शिंगाडे, साधना आचार्य तसेच स्पर्धा समन्वयक युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी, सचिव शुभ पाटील, सदस्य आशिष कडू, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला होता. एसएसएफए बी संघाने ४२० या संघावर मात करून नमो फुटबॉल चषक जिंकला, तर एसबीएससी संघाला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेतील विजेत्या संघाला २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये, तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये आणि सर्व विजेत्या संघांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे उत्तम नियोजन या ठिकाणी होते. भव्य स्वरूपात झालेल्या या स्पर्धेच्या निमित्ताने खेळाडूंना एक व्यासपीठ मिळाले. त्यामुळे खेळाडूंनी स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आयोजकांना धन्यवाद दिले.

# फलंदाजीत अपयशी ठरूनही विराट कोहलीने जिंकली मने!



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने इंग्लंडविरुद्ध दुसरा वनडे सामना जिंकत मालिकेत विजय नोंदवला. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी कर्णधार रोहित शर्माने केलेली ११९ धावांची खेळी टीम इंडियासाठी अगदी महत्त्वपूर्ण ठरली आहे, पण विराट कोहली मात्र पुन्हा एकदा फेल झाला. मोठी खेळी खेळण्यात अपयशी ठरला असला तरी विराटने मैदानावर मात्र मने जिंकली आहेत.

विराट कोहली दुसऱ्या वनडे सामन्यात क्षेत्ररक्षण करत असताना सीमारेषेजवळ होता. जिथे त्याने दोन कमालीचे झेलही टिपले. विराट सीमारेषेजवळ असताना त्याने तिथे असलेल्या बॉल बॉयशी हात मिळवला आणि विराटने स्वत: हात मिळवल्याचे पाहून त्या बॉल बॉयच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्याची प्रतिक्रिया पाहण्यासारखी होती, ज्याचा व्हीडिओ आता व्हायरल होत आहे.

विराट कोहली पुढील चेंडू टाकण्याआधी पुन्हा आपल्या जागेवर जात असताना सीमारेषेच्या पलीकडे दोन बॉल बॉय बसले होते, ज्यांनी विराटला पाहून हात पुढे केला आणि विराटनेही लगेच दोघांना हात मिळवला. त्या दुसऱ्या मुलाने लगेच येस्स म्हणत आनंद साजरा केला आणि छातीवर हात ठेवत आश्चर्य आणि आनंद व्यक्त केला. त्याला विश्वासच बसत नव्हता की तो नुकताच जगातील एक प्रसिद्ध क्रिकेटपटूला प्रत्यक्षात इतके जवळ बघून त्याला हात मिळवून आला आहे.

### नमो चषक कुस्ती स्पर्धा





**पनवेल : नमो चषक भव्य क्रीडा महोत्सव अंतर्गत कळंबोली येथे भव्य दिव्य कुस्ती स्पर्धा रंगली. या स्पर्धेत रुस्तम-ए-हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) या पैलवानाने इराणचा आंतरराष्ट्रीय पैलवान जलाल इराणला चारीमुंड्या चीत करून किताब पटकावला. याशिवाय इतरही कुस्त्या झाल्या. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदींची उपस्थिती लाभली.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com